
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २८७
www.ramprahar.com
सोमवार, ५ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## पाकला दणका! भारताने बगलीहार धरणाचेही पाणी रोखले



**नवी दिल्ली** : पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात अनेक कठोर पावले उचलली आहेत. पाकिस्तानसोबतचा ६५ वर्षे जुना सिंधू करार रद्द करणे हे पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी भारताने उचललेले सर्वात मोठे पाऊल मानले जात आहे. दरम्यान, आता भारताने पाकिस्तानला आणखी एक धक्का देत चिनाब नदीवरील बगलिहार धरणातून पाकिस्तानला जाणारा पाण्याचा प्रवाह थांबवला आहे. जम्मू-कश्मीरमधील बागलीहार जलविद्युत प्रकल्प पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तानमधील वादाचा केंद्रबिंदू ठरला आहे. जम्मूच्या रामबनमध्ये असलेल्या बागलीहार प्रकल्पातील पाण्याचे वहन नियंत्रित करण्याची भारताकडे क्षमता आहे तसेच झेलम नदीवर असलेल्या किशनगंगा प्रकल्पासंदर्भातही भारत लवकरच कडक निर्णय घेण्याच्या तयारीत आहे.

अंतरंग

कर्जतमध्ये चोरट्याला ग्रामस्थांनी पकडले/२
जमीन खरेदी-विक्री फसवणूक टाळण्यासाठी कार्यशाळा/५
दक्ष फायटर संघ एमपीएलचा विजेता/८

# भाजप काम करणारा पक्ष -आमदार प्रशांत ठाकूर

## शेकापचे ज्येष्ठ नेते मारूती गायकर यांनी समर्थकांसह हाती घेतले 'कमळ'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाने नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि विकासकामांना गती देण्यासाठी नेहमीच तत्परता दाखवली आहे. इतर पक्ष केवळ विचार करत असताना भाजप थेट कृती करून दाखवतो. त्यामुळेच भाजपवर लोकांचा विश्वास वाढत आहे आणि हा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी भाजप पूर्ण ताकदीने काम करीत राहील, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलजवळील करंजाडे येथे केले.

शेतकरी कामगार पक्षाला आणखी एक धक्का बसला असून पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच मारूती गायकर यांनी त्यांच्या समर्थकांसह शनिवारी (दि. ३) भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.



आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाला करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी शेकापचे ज्येष्ठ नेते तथा माजी सरपंच मारूती गायकर, माजी सदस्य संतोष आंग्रे, नंदा गायकर, वंदना पोपट, कल्पना गायकर, ठकूबाई वाघे तसेच करंजाडे नोड आणि आदिवासीवाडीतील अनेक कार्यकर्त्यांनी विकासाचे 'कमळ' हाती घेतले. सर्वांचे भाजपमध्ये स्वागत करण्यात आले.

### करंजाडेचा विकास करणार -आमदार महेश बालदी

या वेळी आमदार महेश बालदी यांनी सर्व प्रवेशकर्त्यांचे भाजपमध्ये स्वागत केले आणि स्वच्छ, सुंदर करंजाडे या संकल्पनेतून विकास करण्याची ग्वाही दिली. आगामी काळात करंजाडेच्या विकासासाठी अनेक योजना राबवल्या जातील, असेही त्यांनी सांगितले.

# बारावीच्या परीक्षेचा आज निकाल

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल सोमवारी (दि. ५) जाहीर होणार आहे. विद्यार्थ्यांना दुपारी १ वाजल्यापासून ऑनलाईन निकाल पाहता येणार असल्याची माहिती शिक्षण मंडळाकडून देण्यात आली आहे.

यंदा बारावी बोर्डाची परीक्षा ११ फेब्रुवारी ते ११ मार्च या कालावधीत घेण्यात आली होती, तर प्रात्यक्षिक परीक्षा त्यापूर्वी २४ जानेवारी ते १० फेब्रुवारीदरम्यान झाली. अधिकृत संकेतस्थळासह विविध संकेतस्थळांवर विद्यार्थ्यांना निकाल पाहता येणार आहे.

परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण संकेतस्थळांवर उपलब्ध होतील व माहितीची प्रत घेता येईल, असे मंडळाच्या प्रसिद्धीपत्रात म्हटले आहे.

### निकाल पाहण्यासाठी संकेतस्थळ

बारावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना mahahsscboard.in या बोर्डाच्या अधिकृत संकेतस्थळासह mahahsscboard.in, mahresult.nic.in, hscresult.mkcl.org, hsc.mahresults.org.in आदी संकेतस्थळांवरही आपला निकाल पाहता येणार आहे.

# उपदेश नको, साथ द्या!

### परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी युरोपीय महासंघाला सुनावले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर युरोपियन युनियनकडून आलेल्या प्रतिक्रियेवर परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. भारताला जागतिक मंचावर अशा देशांची गरज आहे, जे भारताच्या बाजूने उभे राहतील, उपदेश करणाऱ्या देशांची नव्हे, असे रोखठोक बोल जयशंकर यांनी सुनावले आहेत.

डॉ. एस. जयशंकर यांनी युरोपियन देशांवर अप्रत्यक्ष टीका करत स्पष्ट केले की, जेव्हा भारत जगाकडे पाहतो, तेव्हा आम्ही भागीदार शोधतो, उपदेशक नव्हे.



विशेषतः असे उपदेशक, जे परदेशात जाऊन शिकवतात, पण स्वतः मात्र त्याच गोष्टींचे पालन करत नाहीत.

अलीकडेच जम्मू-काश्मीरमधील पहलगाम भागात दहशतवाद्यांनी सुरक्षादलांवर हल्ला चढवला होता. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला, तर काही जखमी झाले होते. यानंतर युरोपियन युनियनकडून हल्ल्याचा निषेध करताना काही नैतिक शिकवण देणारे संकेत दिले गेले, ज्यामुळे भारतात नाराजी व्यक्त केली जात आहे.

जयशंकर म्हणाले की, युरोपचा काही भाग अजूनही या समस्येत अडकलेला आहे. काही ठिकाणी सकारात्मक बदल दिसून येत आहेत, पण सर्वत्र तसा अनुभव नाही. जर आपल्याला खऱ्या अर्थाने भागीदारी घडवायची असेल, तर परस्पर समज, संवेदनशीलता आणि जगाच्या कार्यपद्धतीचे भान असणे गरजेचे आहे.

### निवडणूक आयोग सुरू करणार ॲप

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय निवडणूक आयोग नागरिक, निवडणूक अधिकाऱ्यांसह राजकीय पक्ष अशा संबंधित घटकांसाठी एक नवीन, वापरकर्ता अनुकूल डिजिटल इंटरफेस विकसित करत आहे. हे नवीन 'ECINET' नावाचे एकाच ठिकाणी सेवा देणारे व्यासपीठ आयोगाच्या ४०हून अधिक विद्यमान मोबाईल आणि वेब ॲप्लिकेशन्सचे एकत्रीकरण व पुनर्रचना करणारे ॲप असेल.

# पाच मोठ्या बँकांवर आरबीआयची कारवाई

## नियमांचे पालन न केल्याने लाखो रुपयांचा दंड

**मुंबई : प्रतिनिधी**

देशातील पाच मोठ्या बँकांवर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दंडात्मक कारवाई केली आहे. यामध्ये देशातील आघाडीच्या आयसीआयसीआय बँक, ॲक्सिस बँक, आयडीबीआय बँक, बँक ऑफ बडोदा व बँक ऑफ महाराष्ट्र यांचा समावेश आहे.

देशातील सर्वात मोठ्या खासगी बँकांपैकी एक असलेल्या आयसीआयसीआय बँकेला आरबीआयने एकूण ९७.२० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. सायबर सुरक्षा फ्रेमवर्क, केवायसी, क्रेडिट आणि डेबिट कार्डवरील काही सूचनांचे पालन न केल्याबद्दल ही कारवाई करण्यात आली आहे.

ॲक्सिस बँकेला ऑफिस खात्यांच्या अनधिकृत कामकाजाबाबत सूचनांचे पालन न केल्याबद्दल २९.६० लाखांचा दंड ठोठावण्यात आलाय.

आयडीबीआयला किसान क्रेडिट कार्डद्वारे शेती व संबंधित कामांसाठी दिलेल्या अल्पकालीन कर्जावरील व्याज अनुदानाशी संबंधित सूचनांचे पालन न केल्याबद्दल ३१.८ लाखांचा दंड ठोठावला आहे. बँक ऑफ बडोदाला वित्तीय सेवा व ग्राहक सेवा काउंटरवर जारी सूचनांचे पालन न केल्याबद्दल ६१.४० लाखांचा, तर बँक ऑफ महाराष्ट्रला ३१.८० लाखांचा दंड केवायसीशी संबंधित सूचनांचे पालन न केल्याबद्दल ठोठावण्यात आला आहे.

## निवडक

### पाकिस्तानसाठी हेरगिरी; पंजाबमधून दोघांना अटक

**चंदिगड** : जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला आहे. अशातच अमृतसरमधील लष्करी छावणी क्षेत्र आणि हवाई तळांची संवेदनशील माहिती आणि छायाचित्रे लीक करण्याच्या आरोपाखाली दोन जणांना पोलिसांनी अटक केली. शेर मसीह आणि सूरज मसीह अशी आरोपींचे नावे असून त्यांची कसून चौकशी केली जात आहे.

### सहा चेंडूवर सहा षटकार मारून रियान परागचा विक्रम

**कोलकाता** : आयपीएलमध्ये कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या सामन्यात राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान पराग याने सहा चेंडूत सहा षटकार मारून विक्रम केला. त्याने १३व्या षटकात मोईन अलीच्या षटकात पाच चेंडूवर पाच षटकार मारले. त्यानंतर वरुण चक्रवर्तीच्या दुसऱ्या चेंडूवर स्ट्राइक आल्यावरही षटकार मारत आयपीएलमध्ये विक्रम नोंदवला.

# 'ते' दोन शिक्षक निलंबित

**बुलढाणा : प्रतिनिधी**

मलकापूर येथे विद्यार्थ्याला गुण वाढवून देण्याचे आमिष दाखवून त्याच्या आईवर दोघा शिक्षकांनी शारीरिक अत्याचार केला होता. या प्रकरणातील आरोपी शिक्षकांना शाळा व्यवस्थापनाने सेवेतून निलंबित केले आहे.

मलकापूर येथील लोकसेवा शिक्षण बहूउद्देशिय मंडळद्वारा संचालित नूतन विद्यालय व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी ही कारवाई केली. समाधान आत्माराम इंगळे आणि अनिल थाटे अशी आरोपी व निलंबित करण्यात आलेल्या शिक्षकांची नावे आहेत. हे दोघे नूतन माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात सहायक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून मलकापूर पोलिसांनी समाधान इंगळे (वय ४५) आणि अनिल थाटे (वय ४७, दोघेही रा. मलकापूर) या दोघांविरुद्ध गुन्हे दाखल केले. यातील इंगळे हा पीडितेच्या मुलाचा वर्ग शिक्षक आहे. दुसरा आरोपी त्याच शाळेत आहे. यामुळे पीडिता व आरोपी यांची ओळख झाली, फोनवरून बोलणे सुरु झाले. साळसूदपणाचा आव आणणाऱ्या या शिक्षकांनी तुमच्या मुलाला चांगले मार्क देऊ व पहिला नंबर आणू. त्यासाठी तू आम्हाला खूश कर असे आमिष दाखवत जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले.

आरोपींनी पीडितेला वारंवार शारीरिक सुखाची मागणी करत तिला जिवे मारण्याची धमकीही दिली व वेळोवेळी तिच्यावर दोघांनी बलात्कार केला. हा घृणास्पद घटनाक्रम सप्टेंबर २०२४ ते २२ एप्रिल २०२५ या कालावधीत मलकापूर येथे घडला. शिक्षकी पेशाला काळिमा फासणाऱ्या या दोन नराधम शिक्षकांना अटक करण्यात आली होती. ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. ४८ तासांपेक्षा जास्त काळ कोठडी मध्ये राहिल्याने त्यांचे निलंबन अपरिहार्य ठरले.



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या रिटघर येथील लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील अकरावीची विद्यार्थिनी दीक्षिता संतोष भोपी हिने कर्मवीर विद्या प्रबोधिनी प्रमाणपत्र परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. दीक्षिताच्या या उत्कृष्ट यशाबद्दल संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या वेळी प्राचार्य कारंडे, ज्येष्ठ शिक्षिका चांदणे, ज्युनियर कॉलेजचे शिक्षक पाटील, कनिष्ठ लिपिक नितीन भोपी तसेच दीक्षिताचे आई-वडील उपस्थित होते.**

### भाजप सांस्कृतिक महोत्सवात सांगीतिक मेजवानी

# मुग्धा-प्रथमेश यांच्या मैफिलीने श्रोते मंत्रमुग्ध





(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

**खारघर : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या संकल्पनेतून खारघर सेक्टर १२ येथील गावदेवी मैदानावर आयोजित भाजप सांस्कृतिक महोत्सवाने रसिक श्रोत्यांची मने जिंकली. महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी सुप्रसिद्ध गायिका मुग्धा वैशंपायन आणि गायक प्रथमेश लघाटे यांच्या सुमधुर गाण्यांच्या मैफिलीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर आणि 'मराठी बिग बॉस'फेम अंकिता वालावलकर यांनी विशेष उपस्थिती लावली. मुग्धा आणि प्रथमेश यांनी आपल्या बहारदार आवाजाने मैफलीला साज चढवला. त्यांच्या गाण्यांना रसिकांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. विघ्नेश जोशी यांनी कार्यक्रमाचे सुंदरसे निवेदन केले.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, नरेश ठाकूर, माजी नगरसेविका आरती नवघरे, हर्षदा उपाध्याय, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, विजय घरत, महिला मोर्चा शहराध्यक्ष साधना पवार, युवा मोर्चा शहराध्यक्ष नितेश पाटील, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, स्वाती कोळी, कोमल कोळी आदींसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या संगीत मैफिलीचा आनंद लुटला.

भाजप सांस्कृतिक महोत्सवामध्ये मनोरंजन, इतिहास, कला आणि महाराष्ट्राच्या विविध भागांतील प्रसिद्ध मिसळ महोत्सवाचा अनोखा संगम पहायला मिळाला. या महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामुळे नागरिकांना एक वेगळा अनुभव मिळाला.

# माणिकगडावर भरकटलेल्या दोघांची मदत पथकाने केली सुटका

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

वाटाड्या न घेता गुगल मॅपच्या आधारे माणिकगडावर ट्रेकिंगसाठी गेलेल्या प्रा. सुनील पटेल आणि त्याचा मित्र अमित कोटियन (रा. गोरेगाव, कांदिवली) हे गड उतरताना वाट चुकल्याने भरकटले होते, परंतु मदत पथकाशी संपर्क झाल्याने जवळपास चार तासानंतर दोघांनाही सुखरूप खाली आणण्यात आले.



माणिकगडावर जाण्यासाठी खालापूर तालुक्यातील वाशिवली वडगाव येथून पायवाट असून दुसरी पायवाट जांभिवली गाव (ता. पनवेल) हद्दीतून आहे. सुनील पटेल आणि त्यांचा मित्र अमित यांनी रविवारी पहाटेच जांभिवली गावात वाहन लावून ट्रेकिंगला सुरुवात केली होती. गडाच्या माथ्यावर गेल्यानंतर काही वेळ फिरल्यावर त्यांनी साडेअकराच्या सुमारास गड उतरण्यास सुरुवात केली, मात्रगड उतरताना चुकीच्या वाटेने आल्याने ते दरीमध्ये उतरले. वाट चुकल्याचे लक्षात येतात घाबरलेल्या प्रा. पटेल यांनी महाराष्ट्र रेस्क्यू यांच्याशी संपर्क साधत मदत मागितली महाराष्ट्र रेस्क्यूने यशवंती हायकर्स खोपोलीशी संपर्क साधला असता त्यांनी गडाचे वाटाडे शिवाजी देशमुख यांना मदतीसाठी जाण्यास सांगितले.

सामाजिक कार्यकर्ते सुरेश पाटील आणि अपघातग्रस्त मदत पथकाचे गुरुनाथ साठेलकर यांना ही माहिती मिळाल्यानंतर मदतीसाठी तातडीने सूत्र हलली. दरम्यान, देशमुख यांनी हरवलेल्या पर्यटकांशी संपर्क साधत ते तास-दीड तासात सुनील आणि अमितपर्यंत पोहचले. तोपर्यंत खाण्याचे साहित्य आणि पाणी घेऊन गजानन पारधी, गुरूनाथ साठेलकर, राजेश पारठे, अमोल कदम, अमोल ठकेकरदेखील पोहचले. पथकाने भरकटलेल्या दोघांना सुखरूप खाली आणले.

# संपूर्णपणे महिलांकडून संचलित देशातील पहिले ‘फूड हब’ मुंबईत सुरू

**मुंबई : प्रतिनिधी**

प्राप्त संधी आणि प्रशिक्षण याच्या आधारे तळागाळातील सक्षमीत महिला स्वयं सहायता गटातील महिला देशातील अन्न सुरक्षा मानकांना परिभाषित करू शकतात, याचे माहिम सीफूड प्लाझा हे एक उत्तम उदाहरण आहे. महाराष्ट्र ईट राईट स्ट्रीट फूड हब या परिवर्तनशील उपक्रमात महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करत असल्याचा अभिमान आहे, अशा शब्दात अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश कदम यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.



देशातील पहिले संपूर्णपणे महिलांकडून संचलित ‘ईट राईट स्ट्रीट फूड हब’ मुंबईत सुरू करण्यात आले आहे. अन्न आणि औषध प्रशासन, बृहन्मुंबई विभाग यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने, माहिम रेतीबंदर येथे स्वयं सहायता गटाच्या सदस्य असलेल्या महिलांकडून भारतातील पहिले संपूर्णपणे महिलाकडून संचालित ‘ईट राईट स्ट्रीट फूड हब’सुरू करण्यात आले आहे. या उपक्रमाचा प्रमाणपत्र वितरण समारंभ २ मे रोजी माहिम येथे पार पडला. राज्यमंत्री कदम यांच्याहस्ते महिला स्वयं सहायता गटांच्या १५३ महिलांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाला अन्न व औषध प्रशासन आयुक्त राजेश नार्वेकर, बृहन्मुंबई विभागाचे सह आयुक्त (अन्न) मंगेश माने उपस्थित होते.

माहिम सीफूड प्लाझा दर बुधवार, शुक्रवार, शनिवार आणि रविवार सायंकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत सुरू असतो. स्वयं सहायता महिला बचत गटाच्या १५३ महिलांद्वारे पूर्णपणे व्यवस्थापित, प्रत्येक स्टॉलवर कठोर स्वच्छता नियमांचे पालन केले जाते. महिलांनी ईट राईट इंडिया उपक्रमांतर्गत अन्न सुरक्षा प्रशिक्षण आणि प्रमाणन (FoSTaC) कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केला आहे, ज्यामध्ये ऑडिट आणि तपासणीद्वारे अन्न सुरक्षा मानकांचे संपूर्ण पालन सुनिश्चित केले जातात.

# कर्जतमध्ये चोरट्याला ग्रामस्थांनी पकडले

**नेरळ : प्रतिनिधी**

गावात चोरी होण्याआधीच येथील जागरूक ग्रामस्थांनी दाखवलेली हुशारी यामुळे गावात चोरी होता होता टळली असून यामध्ये ग्रामस्थांनी एका चोरट्यास पकडुन पोलिसांच्या ताब्यात देण्यात यश मिळविले आहे, मात्र यावेळी पकडण्यात आलेल्या चोराचे अन्य बाकी चार साथीदार पळून जाण्यास यशस्वी ठरले आहेत. ही घटना रात्री १२ वाजण्याच्या सुमारास कर्जत तालुक्यातील दुर्गम भाग असणाऱ्या साळपे येथे घडली आहे.स्थानिक ग्रामस्थांनी दाखवलेल्या जिगरबाज कामगिरीमुळे आज त्यांचे कौतुक होत आहे.



कर्जत तालुक्यात दिवसाढवळ्या घर फोडण्याचे प्रकार समोर असताना रात्रीच्या सुमारास तालुक्यात भुरट्या चोरट्यांनी धुमाकूळ घातला. त्यातच या चोरट्यांचे लक्ष शहर आणि परिसर असताना आता दुर्गम भागात या चोरट्यांनी आपला डाव साधण्यास सुरुवात केल्याचे चित्र समोर आले आहे.दरम्यान गावात चोरी होण्याआधीच येथील जागरूक ग्रामस्थांनी दाखवलेली कार्यतत्परता आणि हुशारी यामुळे चोरी करण्यासाठी आलेल्या चोरट्यांचा डाव येथील ग्रामस्थांनी हाणून पाडला.

तालुक्यातील अती दुर्गम भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या साळपे आणि कोंदीवडे गावात काही अज्ञात चोरटे हे चोरीच्या उद्देशाने गावाच्या बाहेर हेरगिरी करीत होते. मध्यरात्री १२ वाजण्याच्या सुमारास गावकरी साखेर झोपेत असताना आलेले पाच चोर गावाच्या बाहेर मोरी जवळ एकत्र उभे असताना. काही ग्रामस्थ तरुणांना याबाबत संशय आला असता चौकशीसाठी म्हणून विचारण्यासाठी गेलेल्या तरुणांना समोर येतानाचे पाहून चोरट्यांनी जागेवरून धूम ठोकली. यामधील एक चोर ग्रामस्थांनी मोठ्या शिताफीने पाठलाग करून पकडला तर बाकी साथीदार चार चोर पळून जाण्यास यशस्वी ठरले. ग्रामस्थ तरुणांनी पकडलेल्या चोरट्या कडून माहिती घेण्यास सुरुवात केली असता चोर तोंडातून ब्र काढायला तयार नव्हता, मात्र आपण जळगाव येथील असल्याचे या चोरट्याने तरुणांसमोर आपले तोंड उघडले. ग्रामस्थांनी चोरट्यास पकडुन ठेवून घटनेची माहिती कर्जत पोलिसांना देताच घटनास्थळी कर्जत पोलीस हजर होत मध्यरात्री उशिरा चोट्याला ताब्यात घेण्यात आले आहे.

एकूणच आज साळपे आणि कोंदीवडे ग्रामस्थांनी दाखवलेली कार्यतत्परता यामुळे गावावर आलेले संकट दूर झाले आहे. तर नक्की हे पाच चोर कुठल्या उद्देशाने गावात घुसले होते याचा अधिक तपास कर्जत पोलीस करीत आहे.

# पोलादपूरनजीक ट्रकच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील महाड ते पोलादपूर दरम्यान महाड औद्योगिक वसाहतीतून रात्रपाळीची नोकरी करून लिफ्ट मागून मोटरसायकलवरून परत येताना अज्ञात ट्रकच्या धडकेत मोटरसायकलवर मागील बाजूस बसलेल्या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. पोलादपूर तालुक्यातील अनेक तरुण महाड औद्योगिक वसाहतीत नोकरीदरम्यान ये-जा करताना जीवाला मुकले आहेत.

या वेळी धडक देऊन ट्रकचालक पसार झाला. यानंतर लोहारे येथील ग्रामस्थांनी अपघातस्थळी जाऊन जखमी मोटरसायकलस्वाराची विचारपूस केली असता त्याने मयत व्यक्ती परिचयाचा असल्याचे सांगून तो पोलादपूर आनंदनगर येथील वैभव रमेश पालकर असल्याची माहिती दिली. लोहारे येथील ग्रामस्थांनी पोलादपूर शहरातील संबंधितांना कळविले असता पोलादपूरमधील अनेक तरुणांनी घटनास्थळी धाव घेतली. या वेळी वैभव पालकर याचा जागीच मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाल्याने पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात त्याचा मृतदेह पाठविण्यात आला.

महाड औद्योगिक वसाहतीतील कामगारांना ने-आण करण्यासाठी एमआयडीसीकडून कोणत्याही प्रकारची वाहतूक सुविधा उपलब्ध केली नसल्याने अनेक तरुणांचा नोकरीला जाताना अथवा परतताना अपघाती मृत्यू झाला आहे. असूनही महाड एमआयडीसीतील कारखानदारांनी अनेक वर्षांपासून अद्याप नोकरदारांची व कामगारांची वाहतुकसुविधा उपलब्ध केली नसल्याने उदरनिर्वाहासाठी रोजंदारी करणाऱ्यांच्या जीवावर बेतण्याच्या दुर्दैवी घटनांचे दरवर्षी सातत्य दिसून येत आहे.

# माणगाव आगाराला नवीन बसेस देण्याची मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव बस आगार स्थापन झाल्यापासून जुन्या भंगारात गेलेल्या गाड्या दुरुस्ती करून त्या चालवल्या जात आहेत. त्याही बसगाड्या कुठेही बंद पडत असल्याने माणगाव आगार कोमात गेला आहे. माणगाव येथे पार पडणाऱ्या अधिवेशनात उपमुख्यमंत्री तसेच परिवहन मंत्री यांनी माणगाव आगाराला नवीन बस देण्यासाठी तात्काळ अंमलबजावणी व आदेश द्यावेत, अशी मागणी होत आहे.

मुंबई-गोवा महामार्गावर वसलेले माणगाव हे तालुक्याचे महत्त्वाचे ठिकाण असून, येथे दररोज शेकडो प्रवासी एस.टी. बसचा वापर करतात, मात्र माणगाव एस.टी. आगारात आजही जुन्या, गंजलेल्या आणि वारंवार बिघडणाऱ्या बसगाड्याच धावत आहेत. प्रवाशांना उशीर, बस मधील वारंवार होणारे बिघाडीच्या घटना घडत असल्याने याचा प्रवासी वर्गाला नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या उलट, माणगावपासून ३० किमी अंतरावर असलेल्या महाड आगाराला नुकत्याच कांहीं नव्या बसगाड्या देण्यात आल्या आहेत, मात्र माणगाव आगाराचे पदरी नवीन बस गाड्या अभावी निराशाच आली आहे.



माणगाव बस आगारातून हजारो प्रवासी नागरिक परिवहन महामंडळाच्या बस मधून दररोज प्रवास करीत असतात हे बस आगार १४ एप्रिल २०११ मध्ये स्थापन झाली. त्याला १४ वर्ष लोटली. तेव्हापासून आज तागायत जुन्याच गाड्या या बस आगाराला देण्यात आले आहेत. माणगाव आगाराचे कामकाज नियमित सुरू असतानाही, नव्या बसगाड्यांची टंचाई अजूनही कायम आहे.

माणगाव बस आगार हा रायगड जिल्ह्यातील एक महत्त्वाचा वाहतूक केंद्रबिंदू आहे. स्थानिक तसेच लांबपल्ल्याच्या प्रवासासाठी पुरेश्या बसगाड्या उपलब्ध नसल्याने प्रवाशांना खासगी वाहतुकीचा अवलंब करावा लागतो. परिणामी, एसटी महामंडळाचे उत्पन्न घटत आहे, अपुऱ्या बसगाड्यांमुळे अडचणी वाढत आहेत. सध्या माणगाव आगारात ३१ बसगाड्या कार्यरत आहेत. त्यापैकी १५ सीएनजी व १६ डीझेलवर चालणाऱ्या आहेत तर ६ खासगी भाडेतत्वावर घेतल्या असून त्या लांब पल्यांच्या प्रवाशांसाठी वापरल्या जात आहेत. मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक आणि कोकणातील विविध भागांना जाणाऱ्या – येणाऱ्या गाड्या वेळेवर उपलब्ध नसल्याने अनेकजण खासगी वाहनांकडे वळत आहेत. तसेच माणगाव आगारात कर्मचारी कमी असल्याने असणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून अतीरिक्त काम करून घेतले जाते. या नवीन २० गाड्या देण्यात याव्यात व ५० कर्मचाऱ्यांची गरज आहे. त्यानंतर या बस आगाराचे उत्पन्न नक्कीच वाढ होईल, असे अशा नागरिकांना वाटत आहे.

### *आज एसटी कामगार संघटनेचे महाअधिवेशन*

***छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक भूमीत महाराष्ट्र एस.टी कामगार संघटनेचे ५७ वे राज्यस्तरीय महाअधिवेशन ता. ५ मे सोमवारी सायंकाळी माणगाव येथे मोठ्या उत्साहात होणार आहे. या अधिवेशनास राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुनील तटकरे, परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, उद्योगमंत्री उदय सामंत, महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांच्यासह अनेक मान्यवर या अधिवेशनात उपस्थित राहणार आहेत.***

# नेरळ रेल्वे फाटक येथे वाहतूक कोंडी नित्याचीच!

**कर्जत : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या मुंबई पुणे मेन लाईन वरील नेरळ जंक्शन रेल्वेस्थानकाच्या पुढे कर्जत दिशेकडे रेल्वे फाटक आहे. त्या रेल्वे फाटकातून नेरळ पूर्ण आणि नेरळ पश्चिम भागाकडे जाणाऱ्या वाहनांमुळे दररोज वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे नेरळ पाडा भागात राहणाऱ्या रहिवाशी यांच्यासाठी रेल्वे फाटकातील वाहतूक कोंडी मोठी समस्या बनली आहे. मध्य रेल्वे प्रशासनाकडून नेरळ परिसरात उड्डाणपूल उभारणीसाठी पाऊले उचलावी, अशी मागणी होत आहे.



नेरळ या जंक्शन रेल्वे स्थानकात राहायला आलेल्या रहिवाशी यांची गर्दी वाढली आहे. मुंबई पुणे मार्गवर ८६ किलोमीटर येथे मध्य रेल्वेचे फाटक असून हे फाटक परिसरातील अनेक गावातील वाहने यांच्यासाठी ये-जा करण्याचे महत्वाचे ठिकाण आहे. नेरळ पूर्व भागातील किमान ४० हुन अधिक गावातील वाहने कर्जत कडे जाण्यासाठी या रेल्वे फाटकाच्या वापर करतात. पूर्वी या रेल्वे फाटकात शनिवार आणि रविवारी तसेच सुट्टीच्या दिवशी वाहनांची गर्दी व्हायची, मात्र आता दररोज वाहतूक कोंडीला या रेल्वे फाटकाला सामोरे जावे लागत आहे. त्यात मध्य रेल्वेवर मागील काही महिन्यापासून मालवाहू गाड्यांची संख्या वाढली आहे. त्या मालवाहू गाड्या आणि लांब पल्ल्याच्या गाड्या यामुळे एकावेळी फाटक बंद झाल्यावर किमान दोन ते चार गाड्या निघून गेल्याशिवाय रेल्वे फाटक खुले केले जात नाही. त्यांचा परिणाम नेरळ फाटक परिसरात वाहनांच्या हॉर्न यांच्यामुळे पाडा भागातील रहिवाशी यांच्या कानठळ्या बसतात आणि त्यामुळे ध्वनी प्रदूषण यामुळे हा परिसर त्रस्त झाला आहे.

फाटकाच्या नेरळ गावातील बाजूला वाहनांची गर्दी आता अंबिका हॉटेल हुतात्मा हिराजी पाटील चौकपासून पुढे लोकमान्य टिळक चौक पर्यंत जाऊ लागली आहे. हे अंतर साधारण ४०० मीटरचे पुढे गेले आहे. पलीकडे मातोश्रीनागर पूल पासून ही वाहने कोल्हारे खिंड आणि साई मंदिर चौक पर्यंत पोहचु लागली आहेत. ही सर्व वाहतूक कोंडी नेरळ पाडा भागातील रहिवाशी यांच्यासाठी दररोजची झाली आहे.त्यामुळे या रेल्वे फाटकाच्या बाजूला राहणारे लोक हे वाहनाच्या वाहतूक कोंडीला कंटाळले आहेत.

### *पंचवटी भागात होणार उड्डाणपूल*

***सध्या रेल्वे फाटक असलेल्या ठिकाणी रस्त्याच्या आजूबाजूला लागून निवासी घरे आहेत. त्यामुळे तेथे उड्डाणपूल होण्याची शक्यता कमी आहे. राज्य शासनाने या भागातील पंचवटी येथून रेल्वेवरून जाणारा उड्डाणपूल बनविण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. हा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून सध्याच्या रेल्वे फाटकाच्या जागी भुयारी पूल होण्याची शक्यता आहे.***

# विद्यार्थ्यांनी घेतला स्टेडिअमवर आयपीएल सामना पाहण्याचा अनुभव

**नवी मुंबई : बातमीदार**

नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाप्रमाणेच त्यांच्या सर्वांगीण विकासावर नवी मुंबई महानगरपालिकेचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर, रबाळे येथील पीएम राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय आघाडीवर राहिले आहे. अशाच प्रकारचा एक वेगळा उपक्रम या नमुंमपा शाळा क्र. ५५ मधील ४५० हून अधिक विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात आला असून या विद्यार्थ्यांनी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर जाऊन आयपीएल मॅचचा अनुभव घेतला.



‘क्राय’ या संस्थेच्या सहयोगाने, माजी महापौरसुधाकर सोनवणे यांच्या पुढाकारातून, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष स्टेडियममध्ये जाऊन आयपीएल क्रिकेट सामना अनुभवण्याचा आनंद घेता आला असून शाळेच्या मुख्याध्यापिका स्नेहल विशे यांनीही याकामी महत्वाची भूमिका बजावलेली आहे.


बहुतांशी कष्टकरी कामगार वर्गातील पालकांची मुले पीएम राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालयात शिकत असून त्यांनी स्टेडियमध्ये जाऊन प्रत्यक्ष क्रिकेट सामना बघण्याचा अनुभव पहिल्यांदाच घेता आला. त्यातही विशेष बाब म्हणजे मुंबई इंडियन्स टीमच्या प्रमुख निता अंबानी यांच्या समवेत जगप्रसिध्द क्रिकेट समालोचक श्री.हर्ष भोगले यांच्यासह हा सामना बघण्याचा आनंद विद्यार्थ्यांनी मनमुराद लुटला. ही संधी उपलब्ध झाल्याचा आनंद विद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता.

# ना. आठवले उद्यापासून बौद्ध राष्ट्रांच्या दौऱ्यावर

**मुंबई : प्रतिनिधी**


रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले हे येत्या ६ मे पासुन बौध्द राष्ट्रांच्या दौऱ्यावर रवाना होणार आहे.

ना. आठवले हे मुंबईतुन ६ मे ला ६ दिवसांच्या बौद्ध राष्ट्रांच्या दौऱ्यावर रवाना होणार आहेत. सहा दिवसांच्या या बौध्द राष्ट्रांच्या दौऱ्यामध्ये रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले हे प्रथम थायलँड त्यानंतर व्हिएतनाम आणि त्यानंतर कंबोडिया या तीन बौध्द राष्ट्रांचा दौरा करणार आहेत, अशी माहिती रिपब्लिकन पक्षाच्या वतीने देण्यात आली आहे.



रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुध्दीस्ट चे ते आंतरराष्ट्रीय उपाध्यक्ष आहेत.जागतिक स्तरावर बौध्दांचे ते नेते म्हणुन लोकप्रिय आहेत. त्यामुळे व्हिएतनाम येथे आंतरराष्ट्रीय बौद्ध परिषदेत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना बौध्द नेते म्हणुन प्रमुख पाहुणे म्हणुन निमंत्रीत करण्यात आले आहे.व्हिएतनाम मधील हो ची मिन्ह येथे आंतरराष्ट्रीय बौध्द परिषदेत ते सहभागी होणार आहेत. व्हितनाम, थायलॅन्ड आणि कंबोडिया येथील वरिष्ठ बौध्द धम्म गुरु, बौध्द अभ्यासक विचारवंत यांची या दौऱ्यात ना.रामदास आठवले भेट घेणार आहेत. विविध विषयांवर वार्तालाप करणार आहेत. भारतातील बौध्दधम्म चळवळ आणि आंतरराष्ट्रीय बौध्द धम्म चळवळीबाबत बोधिसत्व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार जगाला कसे मार्गदर्शक आहेत याबाबत ही या बौध्द राष्ट्रां मध्ये ना.आठवले माहिती देणार आहेत. भारतात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्दधम्मचक्रप्रवर्तन करुन फार मोठी धम्म क्रांती केली आहे याची माहिती या बौध्द राष्ट्रांमध्ये ना.रामदास आठवले देणार आहेत.

# बेनवले येथे शिवजयंती उत्सवाची सांगता



**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील बेनवले येथे पारंपारिक पद्धतीने गेली १२७ वर्ष शिवजयंतीचा तिसरा उत्सव थाटामाटात साजरा करण्यात आला.

शिवजयंती प्रथम १९ फेब्रुवारी तदनंतर तिथीप्रमाणे फाल्गुन कृष्ण तृतीयेला होते. लोकमान्य टिळकांनी त्यावेळी समाज एकत्र येऊन शिवरायांच्या प्रेरणेने समाज एकत्र येऊन समाजात नवचैतन्य निर्माण व्हावे शिवरायांचे धैर्य चिकाटी जिद्द व स्पष्ट वक्तेपणा प्रत्येकाने अंगी बालगावा यासाठी पुण्यात व रायगडावर टिळकांनी शिवजयंती उत्सव सुरू केला तो दिवस होता २४ एप्रिल १८९६. हाच कित्ता गिरवत त्यावेळचे बनवलेचे नागा बापू पाटील व वाशी गावातील समाज नेते व शेतकरी आंदोलनकर्ते कैलासवासी हिरो महादू म्हात्रे यांनी १८ गावे एकत्र करून बेनवले येथे १८९८ साली शिवजयंती साजरी केली त्यावेळेस शिवरायांचे मावळे शिवराय व राजमाता जिजाऊ या सर्वांचा साथ शृंगार करून हे मावळे कांदळे, मलेघर, बेनवले, वाशी येथून बैलगाडीने शिवजयंतीचा कीर्तनास आणले जात होते. आता मात्र ते आणले जात नाही.

बेनवले गावाचे ग्रामस्थ व हनुमान मंडळाचे तरुण व हौशी सदस्य आर्थिक स्त्रोत नसताना वर्गणी व हित बांधवांच्या देणगीने उत्सव साजरा करून महाभोजन ही देत असतात २८ एप्रिल २०२५ रोजी ह भ प प्राची मंदार व्यास डोंबिवली यांचे हरिदासी कीर्तन झाले कीर्तनात तबला साथ विद्याधर भोईर हार्मोनियम साथ आत्माराम मोकल गुरुजी बेनवले यांची होती. कीर्तनकारांनी शिवरायांचा पाळणा ही उत्तम गायला कुमारी कक्षा निकेत मोकल बेनवले हिने शिवरायांचा पोवाडा उत्तम गायला. त्यानंतर महाभोजन होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## दुखवटा

### शैलजा जाधव



**खोपोली :** भाजपचे खोपोली शहर अध्यक्ष राहुल जाधव यांच्या मातोश्री शैलजा जाधव (वय ६८) यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. माजी उपनगराध्यक्ष सखाराम जाधव यांच्या त्या पत्नी होत्या. वासरंग कैलास धाम येथे अंत्यसंस्कारावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कै. शैलजा जाधव यांचा जलदान विधी व श्रद्धांजली सभा बुधवारी (दि.७) सुभाष नगर निवासस्थानी सकाळी १०.४५ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

### वैशाली लाठे



**उरण :** ठाणे जिल्ह्यातील शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचे कट्टर, एकनिष्ठ, प्रामाणिक पदाधिकारी, ठाणे जिल्हाध्यक्ष वैशाली लाठे (वय ४५) यांचे रविवारी (दि.४) निधन झाले आहे. वैशाली लाठे या २०१३ पासून शिवा संघटना महिला आघाडीच्या ठाणे जिल्हाध्यक्ष पदावर कार्यरत होत्या. त्यांच्या पश्चात पती व मुलगी असा परिवार आहे. कै.वैशाली लाठे यांना शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीनेही भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली आहे.

## निवडक

### महिलांना व्यवसाय प्रशिक्षण



**पनवेल :** आम्ही उलवेकर मित्र मंडळ, महिला मंडळ आणि माणदेशी फाउंडेशन यांच्यातर्फे उलवे येथे महिलांसाठी मोफत व्यवसाय विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाला महिलांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. गेले पाच दिवस हे व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम सुरू आहे. आम्ही उलवेकर मित्र मंडळ, महिला मंडळ यांच्यातर्फे अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. यापुढेदेखील अशाच प्रकारचे अनेक सामाजिक उपक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती सचिन राजे येरमकर यांनी दिली.

### विनय कदम यांची नियुक्ती

**पनवेल :** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या



आदेशानुसार ॲड. अरुण जगताप अध्यक्ष शिवसेना ग्राहक तक्रार निवारण कक्ष व उपनेते यांनी विनय चंद्रकांत कदम यांची रायगड कक्ष जिल्हा प्रमुख (उरण व पनवेल) पदी नियुक्ती केली, व शिवसेना मुख्य सचिव संजय मोरे यांच्या हस्ते त्यांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले. त्यावेळी रायगड जिल्हा प्रमुख शिवसेना रामदास शेवाळे शिवसेना ग्राहक तक्रार निवारण कक्षाचे सचिव अनिल पुरंदरे तसेच रत्नागिरी जिल्हा कक्ष संपर्क प्रमुख संजय सावंत व उपकार्यालय प्रमुख भावेश भानुशाली उपस्थित होते.

# पनवेलमध्ये ऑल आऊट व कोंबिंग ऑपरेशन

## पोलिसांची कारवाई; गुन्हे दाखल



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाण्यातर्फे करण्यात आलेल्या ऑल आऊट व कोबिंग ऑपरेशनद्वारे मोठ्या प्रमाणात हद्दीमध्ये कारवाई करून आरोपींसह मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलीस उपायुक्त, परिमंडळ २ चे प्रशांत मोहिते व सहा.पोलीस आयुक्त, पनवेल विभाग अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि गजानन घाडगे व पथकाने पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीत कोनगाव, वावंजे, वाकडी, शेड्युल नाका, नेरे, साईगाव, वलप गाव या भागामध्ये कोंबींग आपरेशन तसेच आल आऊट दरम्यान मोठ्या प्रमाणात कारवाई केली आहे. यामध्ये प्रामुख्याने आर्म ॲक्टमध्ये १ गुन्हा दाखल केला आहे. अंमली पदार्थ सेवन प्रकरणी दोघा जणांना ताब्यात घेतले आहे. देशी दारू विक्रीप्रकरणी दोन जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एका ठिकाणी गावठी हातभट्टीवर कारवाई करून ती नष्ट करण्यात आली आहे. बेकायदेशीररित्या गुटखा विक्रीप्रकरणी एका जणावर कारवाई करण्यात आली आहे. त्यासह नाकाबंदी दरम्यान, ५२ वाहने चेक करण्यात आली असून नियमांचे उल्लंघन केलेले आढळून आलेले नाही, तसेच हद्दीत बांगलादेशीयांचा शोध घेण्यात आला आहे.

अशाच प्रकारे संशयित व्यक्तींवर कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान वपोनि, पोनि, आठ सपोनि/पोउपनि, ४३ अमलदार, झोन दोन स्ट्राइकिंग, आरसीपी पथक असे सहभागी झाले होते.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्यास अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल चिकन आणण्यासाठी गेलेल्या एका १० वर्षीय मुलीसोबत ६३ वर्षीय अंडे विक्रेत्याने अश्लील चाळे करून तिचा विनयभंग केल्याची घटना उघडकीस आली आहे. सफाऊल इद्रिसमियाँ अन्सारी (वय ६३) असे या अंडे विक्रेत्याचे नाव असून पनवेल तालुका पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

या घटनेतील पीडित आदिवासी मुलगी पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहते. ती चिकन आणण्यासाठी गेली होती, मात्र चिकन दुकानदार नसल्याने ती दुकानदाराची वाट पाहत उभी होती. दरम्यान, या दुकानाशेजारी असलेला अंडे विक्रेता सफाऊल अन्सारी याने पीडित मुलीला दुकानात बोलावून तिच्यासोबत अश्लील चाळे केले. त्यामुळे पीडित मुलीने आरडाओरड करून तेथून पळ काढला व घडला प्रकार तिच्या आई-वडिलांना सांगितला. त्यानंतर त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन याप्रकरणी तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी सफाऊल अन्सारी याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## खारघर येथील हुक्का पार्लरवर पोलिसांचा छापा

**पनवेल : वार्ताहर**

खारघर पोलिसांनी हुक्का पार्लरवर धाड टाकून हा हुक्का पार्लर चालवणाऱ्या सहा जणांवर नुकतीच कारवाई केली. या ठिकाणी शासनबंदी असलेला हुक्का सर्रास वापरला जात असल्याचे निदर्शनास आले.

खारघर पोलीस ठाणे हद्दीत सेक्टर १०, कोपरा गावालगत ब्लॅक फॉरस्ट हुक्का पार्लर आहे. या ठिकाणी महाराष्ट्र राज्य प्रतिबंधित असलेले तंबाखूजन्य पदार्थ वापरून हुक्का ओढला जात असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक सुर्वे यांनी एक बनावट ग्राहक पाठवून आधी खात्री करून घेतली. त्यानंतर या हुक्का पार्लरमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रदीप आव्हाड, उपनिरीक्षक फिरोज आगा, हवालदार सचिन गोसावी, अविनाश गायकवाड, राहुल डावरे यांच्या पथकाने या हुक्का पार्लरवर छापा मारण्याची कारवाई केली.

या कारवाईत या पोलीस पथकाला येथे वेगवेगळ्या पद्धतीचे सुगंधित तंबाखूचे डबे, आणि हुक्का पॉट, पाईप्स अन्य सामान असा जवळपास दीड लाखांचा मुद्देमाल आढळून आला. त्यावर पोलिसांनी हा सारा मुद्देमाल जप्त करत या प्रकरणी हुक्का पार्लरचा व्यवस्थापक रोहित राजपूत, बुटासिंग जसपाल सिंग सह इतर चार जणांविरोधात कारवाई करत खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

## नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन गुरुवारी (दि.१) नवीन पनवेल येथे करण्यात आले होते.

सुरुवातीला मंडळाचे अध्यक्ष प्रवीण भामरे, जन्मबंध फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रभाकर मोरे, सचिव हेमकांत सोनार, कोषाध्यक्ष विजय भामरे, महिला मंडळ अध्यक्षा संगिता विसपुते, कार्याध्यक्ष धनराज विसपुते, सल्लागार पुरुषोत्तम पोतदार, सहसचिव सी.डी.मोरे आदी मान्यवरांच्या हस्ते सुवर्णकार समाजाचे आराध्यदैवत संत नरहरी महाराज छत्रपती शिवाजी महाराज, मंडळाचे दिवंगत अध्यक्ष कै.संजय खरोटे यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलन करण्यात आले.



व्यासपीठावर या वेळी मंडळाचे अध्यक्ष प्रवीण भामरे, सचिव हेमकांत सोनार, कोषाध्यक्ष विजय भामरे, महिला मंडळ अध्यक्षा संगिता विसपुते, कार्याध्यक्ष धनराज विसपुते हे या वेळी उपस्थित होते.

मंडळाचे प्रास्ताविक सचिव हेमकांत सोनार यांनी केले. या प्रास्ताविकात सन-२०२०-२५या कालावधीत मंडळाने केलेल्या कामाचा आढावा वाचून दाखविला. यामध्ये सिडको प्रशासन, मंत्रालयीन कामकाज, धर्मदाय कार्यालय इ.कामाचा आढावा तसेच मंडळाने आयोजित केलेल्या त्रैमासिक, तातडीच्या सभा, वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेहसंमेलन, विद्यार्थी/सभासद गुणगौरव, आरोग्य शिबिर, संत नरहरी महाराज समाज भवन इ. समावेश होता.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मंडळाचे सहसचिव सी. डी मोरे, संजय सोनार, उदय विभांडिक, मनोज सोनार, दिपक वाघ, अतुल जडे, राजेश विभांडिक तसेच महिला मंडळ, युवक मंडळ आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री अहिरराव (श्रीक्षेत्र गणपतीचे पाली ता.सुधागड) यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. शांताराम सोनारसर यांनी मानले.

## खारघरच्या हाइड पार्क रहिवाशांचे विविध मागण्यांसाठी निवेदन

### ◆ भाजप कार्यालयात परेश ठाकूर यांच्यासोबत चर्चा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील सेक्टर ३५ जी खारघर येथील हाइड पार्क सीएसएस लि. सोसायटीतील रहिवाशांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना निवेदन देण्यासाठी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची भेट घेतली. या वेळी विविध समस्या व विकासकामांबाबत चर्चा करून लेखी निवेदन त्यांच्याकडे सादर केले.



या वेळी सोसायटी पदाधिकाऱ्यांनी निवेदनात काही प्रमुख मुद्द्यांकडे लक्ष वेधले आहे. यामध्ये पर्यावरणपूरक उपक्रम म्हणून सोसायटीमध्ये सौरऊर्जा पॅनेल्स बसवण्याचे नियोजन असून त्यासाठी आमदार निधीतून मदतीची मागणी करण्यात आली. गेल्या अनेक वर्षांपासून पाणीपुरवठा अपुरा असून यंदा पावसाळ्यातच टंचाई जाणवू लागली आहे. झचउ मार्फत दररोज किमान ६० युनिट पाण्याचा पुरवठा होण्याची मागणी करण्यात आली आहे.

सोसायटीलगतच्या सेवा रस्त्यांची अवस्था अतिशय खराब आहे. पावसाळ्यानंतर ठोस डांबरीकरणाचे काम तातडीने व्हावे, अशी मागणी केली आहे.

सोसायटीशेजारील मोकळ्या जागेवर अनेक वर्षांपासून उद्यानाचे नियोजन प्रलंबित आहे. या ठिकाणी अतिक्रमण आणि असामाजिक प्रवृत्ती वाढत असल्याने तत्काळ उद्यानाच्या विकासासाठी आदेश द्यावेत, अशी विनंती करण्यात आली. परिसरातील सीआयडीसीओच्या जमिनीवर अवैध मांसविक्री करणाऱ्या दुकानांचे अतिक्रमण झाले असून त्यांच्यावर कारवाईची मागणी करण्यात आली.

परिसरात पोलीस गस्त अभावामुळे रात्रीच्या वेळेस असामाजिक प्रवृत्ती वशात आल्या आहेत. त्यामुळे नियमित मोटारसायकल गस्त ठेवावी, अशी मागणी केली आहे. एका व्यावसायिक गाळ्यात सुरू असलेल्या मशिदीमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्याची कायदेशीरता तपासावी, अशी विनंती करण्यात आली.

कचरा उचलण्यासाठी येणारे कर्मचारी अनियमित असून त्यामुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण होत आहेत. सेवा नियमित करण्याची मागणी करण्यात आली. परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या झपाट्याने वाढत असून लहान मुले व वृद्ध नागरिकांना धोका निर्माण झाला आहे. यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी विनंती करण्यात आली.

हाइड पार्क सोसायटीचे पर्यावरणपूरक सौरऊर्जा प्रकल्प हे आमचे स्वप्न असून, आमदार निधीतून त्यासाठी मदत मिळाल्यास आम्हाला दिलासा मिळेल, असे सचिव संगीता शुक्ला यांनी सांगितले. रहिवाशांच्या या विविध मागण्यांकडे लक्ष देऊन आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात, अशी अपेक्षा सोसायटीकडून व्यक्त करण्यात आली आहे.

माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांना निवेदन देतेवेळी भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, हाइडपार्क बिल्डिंग प्रमुख सोनल लाहा, खारघर मंडल युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, अक्षय लोखंडे, सचिन वास्कर, हाइड पार्क सोसाइटी सेक्रेटरी शुक्ला, सदस्य मणि शास्त्री, सदस्य सर्वेश शर्मा आदी उपस्थित होते.

## टीपीएस ७चे सीमांकन करून शेतकऱ्यांना मालमत्ता पत्रके वाटप करा

### प्रकल्पग्रस्त ग्रामविकास सामाजिक संस्थेचे सिडकोला निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रकल्पग्रस्त ग्रामविकास सामाजिक संस्था (नोंदणीकृत) यांनी सिडको उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांकडे टीपीएस (नगररचना परियोजना) ७चे सीमांकन करून शेतकऱ्यांना त्यांची अंतिम भूखंड मालकीचे पत्रके तातडीने वाटप करण्यात यावी, अशी मागणी एका निवेदनाद्वारे केली आहे.

संस्थेच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाने याबाबत २९/१०/२०२२ रोजी प्रारूप योजनेस मान्यता दिली असून २९/१०/२०२३ रोजी अंतिम प्रारूप योजनेची अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे. टीपीएस ७ ही योजना पनवेल तालुक्यातील देवद, विंगणे, शिवकर, उसर्ली खुर्द, कोळके इत्यादी गावांमधील काही जमिनींच्या अधिग्रहणासाठी जाहीर करण्यात आली होती, मात्र अद्याप शेतकऱ्यांना त्यांचे भूखंड मिळालेले नाहीत. प्रारूप योजनेनुसार १२ महिन्यांच्या आत भूखंड देण्याचे स्पष्ट निर्देश असूनही अद्याप ही प्रक्रिया रेंगाळलेली आहे.

शासनाच्या आदेशानंतरदेखील भू-संपादन विभागाकडून अद्याप अंतिम भूखंडधारकांना त्यांच्या भूखंडांचे सीमांकन करून ताबा देण्यात आलेला नाही. परिणामी सहा वर्षांहून अधिक काळ शेतकरी आपली जमीन गमावून नुकसान सहन करत आहेत. या भूखंडांवर कोणतेही नियंत्रण नसल्यामुळे त्याठिकाणी अतिक्रमण व असामाजिक कारवाया होत आहेत.

संस्थेने शासनाला विनंती केली आहे की, लवकरात लवकर जिल्हा प्रशासन, सिडको, नैना व इतर संबंधित यंत्रणांनी समन्वय करून टीपीएस ७ योजनेत सामाविष्ट झालेल्या शेतकऱ्यांना त्यांचे हक्काचे भूखंड ताब्यात द्यावेत. या संदर्भात को-ऑर्डिनेटर्सची नेमणूक करून वेळेवर बैठका घ्याव्यात आणि मालमत्ता पत्रकांचे वाटप लवकरात लवकर पूर्ण करावे.

संस्थेचे अध्यक्ष, सेकेटरी यांनी या निवेदनावर स्वाक्षरी केली असून याची प्रत आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनाही सादर करण्यात आली आहे.




**पनवेल : एस.बी.स्टार ग्रुप, स्वर्णभुमी कॉम्पलेक्स, सुकापूरच्या वतीने नवीन पनवेलमध्ये शनिवारी संयुक्त जयंती महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी जि. प.सदस्य अमित जाधव, सुकापूर ग्रामपंचायत सरपंच योगिता पाटील, सदस्य महेश पाटील, प्राची जाधव, भाजप सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील आदी उपस्थित होते.**

## उरणमध्ये जेएचके कथ्थक क्लासचे स्नेहसंमेलन उत्साहात

**उरण : बातमीदार**

कथक नृत्याचा नृत्य प्रवास म्हणजे नृत्यारंभ. असेच नृत्यारंभ उरणमध्ये साजरे झाले. उरण येथे विमला तलाव येथे जेएचके कथ्थक क्लासच्या प्रथम नृत्यारंभाचे स्नेहसंमेलन साजरे करण्यात आले.

नृत्यारंभ म्हणजे हा प्रवास जेएचके कथक क्लासच्या विद्यार्थ्यांचा पहिल्या वर्षापासून ते चौथ्या वर्षापर्यंतच्या वर्धापन दिनाचा प्रवास सुंदर नृत्यातून सादर केला. जेएचके म्हणजे जय हनुमान कला मंच यांचे अनेक नृत्य वर्ग उरणमध्ये चालत आहेत. प्रत्येक वर्गाचे नाव वेगळ असले तरी संस्था हि एकच आहे.ज्याप्रमाणे जेएचके कथ्थक,



जे एच के झुंबा, जे एचके किड्स असे अनेक वर्ग गेले कित्येक वर्ष उरणमध्ये विविध डान्स फॉर्ममध्ये शिकण्याचे काम करत आहेत. जे एचके कथ्थक व इतर वर्गामध्ये विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक व गुरु हे रवींद्र वासुदेव म्हात्रे राहणार करंजा उरण हे या नृत्य कलेचे ज्ञानदानाचे कार्य गेली कित्येक वर्षे अविरतपणे करित आहेत. रवि सरांकडे १५० हुन अधिक नृत्य शिष्य नृत्यकला शिकत आहेत. यातील कथक वर्गामध्ये ३० पेक्षा अधिक नृत्य शिष्य आहेत. यामध्ये सर्वात छोट्या कथ्थक विद्यार्थीनींचे वय अवघे चार वर्षे असून सर्वात मोठ्या विद्यार्थिनीचे वय ६२ वर्षे एवढे आहे.

नृत्याच्या 'नृत्यारंभ या आगळ्यावेगळ्या स्नेहसंमेलनामध्ये कथ्थकच्या विद्यार्थिनींनी तीन ताल मधील काही बंदिशी सादर केल्या. यामधे 'गतनिकास' प्रकारा अंतर्गत सीधे हात की गत, मटकी गत, बासुरी गत चे सुंदर सादरीकरण केले. भावपक्ष अंतर्गत ३ नृत्यांचे अतिशय मनमोहक असे सादरीकरण केले. रवींद्र म्हात्रे यांनीसुद्धा या वेळी कथ्थकचे अतिशय उत्तम सादरीकरण केले आणि सर्व प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

या नृत्याच्या मैफिलीसाठी डॉ. हरिओम म्हात्रे, श्लोक पाटील, अभया म्हात्रे, अनंत घरत, केसरीनाथ पाटील आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दया परदेशी यांनी आपल्या सुंदर भाषाशैलीतून उत्तमरीत्या केले. या कार्यक्रमासाठी आर्थिक योगदान देण्याचे कार्य डॉ. सत्या ठाकरे, डॉ.हरिओम म्हात्रे, डॉ. संगीता डाके, केशरीनाथ पाटील व सर्व कथ्थक विद्यार्थिनींनी केले.

जे एचके चे कथ्थक वर्गाचे मार्गदर्शक रवींद्र सर व त्यांच्या सर्व विद्यार्थीनीं यांच्या सहकार्याने कार्यक्रम सुंदररित्या संपन्न झाला. तसेच स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने सादर केलेल्या या नृत्याविष्काराने रसिकांना एक वेगळाच आनंद दिला याकरिता रसिकांनेही या नृत्य कलेसाठी टाळ्यांनी दाद दिली.

## संपादकीय

# पाकिस्तानची आणखी कोंडी

मानवजातीसाठी सर्वात मोठा धोका बनत चाललेला दहशतवाद हा पाकिस्तान स्वतःच्या फायद्यासाठी आजवर पोसत आला आहे. या माध्यमातून दुसऱ्या त्रास देणारा शेजारी देश पहलगाम हल्ल्यानंतर मात्र अडचणीत येताना दिसत आहे, कारण या हल्ल्यानंतर भारत आता पाकिस्तानची सर्व बाजूंनी कोंडी करतोय.

भारताचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जम्मू काश्मीरमध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. पहलगाम येथे केलेल्या या भ्याड हल्ल्यामध्ये २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला. हल्ल्यात पाकिस्तानचा हात असल्याचे तपासात उघड झाल्यानंतर भारताने कठोर पावले उचलली आहेत. मोदी सरकारकडून वाघा–अटारी सीमेवरील व्यापारी मार्ग बंद करण्यात केला. त्यासोबतच १९६०चा सिंधू जलकरारही निलंबित केला. याचबरोबर पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करीत भारतात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना तत्काळ देश सोडण्याचे आदेश दिले. भारताने पाकिस्तानसाठी आपले हवाई क्षेत्रही बंद केले आहे. याशिवाय भारतीय सेना आणि सुरक्षा यंत्रणांविरोधात प्रक्षोभक तसेच धार्मिकदृष्ट्या संवेदनशील कंटेट प्रसारित करणाऱ्या १६ प्रमुख पाकिस्तानी यूट्युब चॅनलवर बंदी घातली आहे. या चॅनलवरून खोटे आणि गैरसमज पसरवणारे व्हिडीओही दाखवले जात होते. त्यानंतर भारताने पाकिस्तानसोबतचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष व्यापार बंद केला आहे. मोदी सरकारने पाकिस्तानातून येणाऱ्या सर्व प्रकारच्या वस्तूंवर बंदी घातली आहे. वाणिज्य मंत्रालयाकडून याबाबत अधिसूचना जारी करण्यात आली आहे. पाकिस्तानातून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे होणाऱ्या सर्व आयातीवर बंदी लागू करण्यात आली आहे. मग ती थेट आयात असो किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही तिसऱ्या देशातून असो, पाकिस्तानच्या सर्व वस्तूंवर बंदी घालण्यात आली आहे. सरकारने लादलेले हे निर्बंध २०२३च्या परराष्ट्र व्यापार धोरणात नवीन तरतुदी असल्याचे सांगण्यात आले आहे. परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाने दिलेल्या माहितीनुसार जर कोणत्याही परिस्थितीत आयातीला परवानगी दिली गेली, तर त्यासाठी भारत सरकारची विशेष मान्यता आवश्यक असेल. यापूर्वी थेट व्यापारावर बंदी घालण्यात आली होती. आता अप्रत्यक्ष आयातीवरही निर्बंध लागू करण्यात आले आहेत. भारताच्या या निर्णयामुळे पाकिस्तानला आर्थिक फटका बसणार आहे. दरम्यान, बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने पाकिस्तानी जहाजांना भारतीय बंदरांमध्ये प्रवेश करण्यास बंदी घातली आहे तसेच भारतीय ध्वज असलेल्या जहाजांना पाकिस्तानातील बंदरांमध्ये जाण्यास बंदी घालण्यात आली आहे. भारतीय मालमत्ता, मालवाहतूक आणि बंदर पायाभूत सुविधांचे रक्षण करण्यासाठी, व्यापारी शिपिंग कायदा, १९५८च्या कलम ४११ अंतर्गत तत्काळ निर्बंध लादण्यात आले आहेत. पाकिस्तानातून येणाऱ्या टपाल आणि पार्सल सेवेलादेखील भारत सरकारने स्थगिती देण्यात आली आहे. राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वजनिक धोरणाच्या हितासाठी हे महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचे मोदी सरकारने म्हटले आहे. भारताकडून पाकिस्तानला एकापाठोपाठ एक धक्के दिले जात आहेत. भारताने पाकिस्तानच्या विरोधात आणखी एक मोठा निर्णय घेत बगलीहार धरणातून चिनाब नदीचे पाणी थांबवले आहे. दहशतवादाला सडेतोड प्रत्युत्तर देण्यासाठी भारत अशीच कठोर पावले उचलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आधीच बेजार असलेल्या पाकिस्तानची पुरती वाट लागणार आहे.

# कर्जत शहरातील वाहतूक कोंडी ठरतेय डोकेदुखी





**खबरबात**
**विजय मांडे**

कर्जत शहरात वाहतूक कोंडी होण्याचे कारण म्हणजे कुठेही उभ्या करण्यात येणाऱ्या रिक्षा आणि बाजारपेठेतील दुतर्फा असलेले हातगाडीवाले व फेरीवाले. या सर्वांच्यामुळे कर्जतच्या बाजारपेठेतच नव्हे; तर शहरातून चालणे कठीण होत आहे. त्यांच्यावर कुणाचाच वचक नाही. असा सूर कर्जतकरांकडून ऐकायला मिळतो. अनेकजण याबाबतीत पाठपुरावा करतात त्याला यश येत नाही. दिवसेंदिवस शहरातील वाहतूक कोंडी डोकेदुखी ठरत आहे. सणासुदीला बाजारपेठेत एकच गर्दी होत असते.

कर्जत ग्रुप ग्रामपंचायत असताना रस्ते फार लहान होते. ते रुंदीकरण करण्याचे काम तत्कालीन आमदार स्व. तुकाराम सुर्वे यांनी हाती घेतले होते. त्या वेळी त्यांना खूप विरोध झाला होता. त्याला न जुमानता रस्ते थोडेसे रुंद झाले, मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही, कारण हे रस्ते त्या वेळीदेखील म्हणजे ३५–४० वर्षांपूर्वी हातगाडीवाल्यांनी काबीज केले होते. त्यानंतर कर्जत ग्रुप ग्रामपंचायत आणि दहिवली ग्रामपंचायतीची एकत्रित कर्जत नगर परिषद जाहीर झाली. त्यामध्ये शिरसे ग्रामपंचायतीतील आकुर्ले गावाचाही समावेश करण्यात आला होता. ही घटना १९९२ सालची. त्यानंतर १९९४ साली झालेल्या पहिल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाची सत्ता आली. त्यानंतर १९९९ साली काँग्रेसमध्ये फूट पडून राष्ट्रवादी काँग्रेसची निर्मिती करण्यात आली. त्या वेळी झालेल्या निवडणुकीत सुरेश लाड आमदार झाले.

तत्कालीन आमदार सुरेश लाड यांनी शहरातील रस्ते काँक्रीट करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला व शहरातील रस्ते रुंद करण्यासाठी स्वतः लक्ष घातले. त्या वेळीही व्यापारीवर्गाने नाराजी दाखविली होती. त्यांना समजावून तर काहींचा विरोध पत्करून त्यांनी दोन्ही बाजारपेठा व शहरातील काही रस्त्यांचे रुंदीकरण घडवून आणले. रस्ते मोठे झाले, मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. बाजारपेठेतील रस्त्यांच्या दुतर्फा हातगाडी व फेरीवाल्यांनी ठाण मांडले. खरेतर नगर परिषद परवाना असलेल्या हातगाड्या किती? आणि प्रत्यक्षात हातगाड्या किती? काही वर्षांपूर्वी नगरसेवकांच्या नावावरसुद्धा हातगाड्या होत्या. हा म्हणजे संशोधनाचा विषय आहे. त्यांच्यावर ठोस कारवाई केल्याचे ऐकिवात नाही. कुणीतरी विरोध केला की, तात्पुरती मलमपट्टी करण्याचे प्रकार होत असतात, मात्र काही दिवसांनी 'जैसे थे, परिस्थिती होते. विविध शासकीय खात्याच्या अधिकाऱ्यांनी, नागरिकांनी आणि संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्रित बैठक घेऊन शहरातील वाहतूक कोंडीवर तरच मार्ग निघेल. तसा प्रयत्न कर्जत बचाव समितीच्या माध्यमातून होत आहे.

कपालेश्वर मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळादरम्यानच्या रस्त्यावर नो हॉकर्स झोन करण्याचे ठरले होते. त्यानंतर त्या रस्त्यावर हातगाडीला बंदी घालण्यात आली होती. हा ठराव करताना त्या वेळी जे नगरसेवक होते. त्यातील दोन–तीन नगरसेवक मागील वेळेससुद्धा नगर परिषदेत आहेत, मात्र याबाबत ते काहीही करू शकत नाहीत. मध्यंतरी या रस्त्यावरील फेरीवाल्यांवर कारवाई करून त्यांना उठवण्यात आले होते, पण मतांच्या राजकारणासाठी त्यामध्ये राजकीय हस्तक्षेप झाला आणि ही कारवाई तीन–चार दिवसांचीच ठरली. आता तर त्या रस्त्यावरून चालणेही कठीण होऊन बसले आहे. आम्ही ज्यांना निवडून दिले. त्यांनी हे काम केले पाहिजे. अशी उघड चर्चा नेहमीच होत असते, परंतु त्याकडे दुर्लक्ष केले जाते. आता नगर परिषदेवर प्रशासक आहेत. त्यांनी मनात आणले तर सर्व काही ठीकठाक होईल.

फेरीवाले, हातगाडीवाले रस्त्यावर बसतात त्यात भर म्हणून शासनाने रिक्षा परवाने खुले केले त्यामुळे अनेक बेरोजगार युवक रिक्षा व्यवसायात पडले. रस्ते तेच, मात्र वाहनांची संख्या दुप्पट, तिप्पट झाल्याने त्यांचे नियोजन करता करता पोलीस कर्मचाऱ्यांची दररोज कसरत होते. कर्जत शहरात कोणत्याही चौकात मोकळी जागा नाही. सर्वच ठिकाणी रिक्षावाले अगदी बिनदिक्कतपणे रिक्षा उभ्या करतात. दररोज रिक्षाचालक आणि अन्य वाहनधारक यांची भांडणे होत असतात, पण एक आहे ज्या वेळी आरटीओचा कॅम्प असतो तेव्हा यातील काही रिक्षा आडबाजूला लावल्या जातात. याकडेही दुर्लक्ष केले जाते. काही महिन्यांपूर्वी टोविंग व्हॅन उपलब्ध होती, पण पोलीस प्रशासन आणि नगर परिषद प्रशासन याची जबाबदारी घेत नसल्याने ती बंद आहे. पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारीही कमी आहेत. त्यामुळे त्याचाही नाईलाज आहे. टोविंग व्हॅन सुरू असताना चांगली शिस्त लागली होती. वाहतूक कोंडीची समस्याही बऱ्यापैकी सुटली होती, मात्र आता सारे पुन्हा सुरू झाले आहे.

चारफाटा आणि श्रीराम पुलावर गेल्या वर्षापासून प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. श्रीराम पुलाशेजारी आमदार महेंद्र थोरवे यांनी नवीन पूल बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. या नवीन पुलाचे काम सुमारे पंचाहत्तर टक्के झाले आहे. या वर्ष अखेरीस ते पूर्ण होईल. अशी अपेक्षा आहे. त्यानंतर श्रीराम पुलावर होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न नक्की सुटेल, पण चार फाट्यावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्यासाठी नव्याने रेल्वे पूल बंधणे गरजेचे आहे. हा पूल मुद्रे बुद्रुक गावाकडील बाजूस होणार आहे, कारण विरुद्ध बाजूला नवीन रेल्वेस्थानकाचे काम सुरु आहे. हा पूल लवकरच उभारण्यात येईल असे वाटते. त्याची प्राथमिक मोजणी झाली असल्याचे तेथील रहिवासी सांगतात. हा पूल झाल्यानंतर चारफाट्यावर वाहतूक कोंडी होणार नाही.

हातगाडी व फेरीवाले यांच्यासाठी एक वेगळेच ठिकाण ठरवून त्यांची व्यवस्था करायला हवी. कोरोनाच्या काळात या सर्वांना पोलीस मैदानात व्यवस्था करून दिली होती. त्या वेळी सर्वांना सोयीस्कर झाले होते. दिवसाही बाजारातील रस्ता खूप मोठा आहे हे पहायला मिळत होते. दुसरा उपाय म्हणजे चारचाकी गाड्या बाजारपेठेत येऊ न देणे. ठरवलेले एक दिशा मार्ग अमलात आणणे. याबाबत तहसीलदार, पोलीस निरीक्षक, मुख्याधिकारी यांची मागच्या स्वच्छता अभियानाच्या वेळी चर्चा झाली. त्या वेळी नगराध्यक्ष सुवर्णा जोशीसुद्धा उपस्थित होत्या, मात्र अद्याप त्यावर सविस्तर चर्चा झाली नाही. या विविध शासकीय खात्याच्या अधिकाऱ्यांनी, नागरिकांनी आणि संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्रित बैठक घेऊन शहरातील वाहतूक कोंडीवर मार्ग निघेल. त्यासाठी कर्जत बचाव समितीच्या माध्यमातून प्रयत्न सरू आहेत.



## बदलते तंत्रज्ञान

# यूपीआय व्यवहार होणार अधिक जलद

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) ने युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस व्यवहार जलद आणि



अधिक कार्यक्षम करण्याचा निर्णय घेतला आहे. १६ जूनपासून यूपीआय व्यवहार फक्त १५ सेकंदात पूर्ण होतील. सध्या यूपीआय व्यवहार पूर्ण होण्यासाठी ३० सेकंदाचा वेळ लागत होता. या बदलाचा उद्देश यूपीआय वापरकर्त्यांचा अधिक चांगली सुविधा देणे आणि व्यवहार पूर्ण करण्यासाठी लागणारा वेळ कमी करणे हा आहे. एनपीसीआयने बँका आणि पेमेंट ॲप्सना विविध यूपीआय सेवांसाठी जलद प्रक्रिया मानके लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे वापरकर्त्यांना जलद व्यवहार करण्याची खात्री आणि अधिक विश्वासार्ह सविधा मिळेल अशी अपेक्षा आहे.

या निर्णयाचा उद्देश पेमेंट प्रक्रिया, व्यवहार पडताळणी आणि पूर्ण झालेला व्यवहार कॅन्सल करण्यामध्ये होणारा विलंब कमी करणे आहे. एनपीसीआयने सर्व सहभागी संस्थांना सल्ला दिला आहे की, या जलद वेळेमुळे तांत्रिक घट किंवा सेवा व्यत्यय वाढणार नाहीत याची खात्री करावी.

१२ एप्रिल रोजी झालेल्या यूपीआय आउटेजनंतर हे बदल करण्यात आले आहेत, जिथे एनपीसीआयने तांत्रिक समस्यांमुळे आंशिक व्यवहार अपयशी ठरल्याचे मान्य केले आणि जलद निराकरण करण्याचे आश्वासन दिले.

एप्रिलमध्ये देशातील दैनिक युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस व्यवहार ६०० दशलक्षच्या वर पोहचले. १ मे रोजी सरकारने जारी केलेल्या आकडेवारीनुसार या महिन्यात इन्स्टंट पेमेंट सिस्टममध्ये ५९६ दशलक्ष व्यवहार नोंदवले गेले, जे मार्चमध्ये ५९० दशलक्ष होते.

अलीकडेच मार्च आणि एप्रिलमध्ये यूपीआयला अनेक समस्यांचा सामना करावा लागला ज्यामुळे जीपे आणि फोनपेसारख्या ॲप्समध्ये गंभीर व्यत्यय आले, ज्यामुळे प्लॅटफॉर्मच्या विश्वासार्हतेबद्दल वाढत्या चिंतेकडे लक्ष वेधले गेले.

२६ मार्च, १ एप्रिल आणि १२ एप्रिल या तीन आठवड्यात तीन मोठ्या समस्यांची नोंद झाली आहे, ज्यामुळे मासिक डिजिटल व्यवहारांमध्ये सुमारे २५ लाख कोटी रुपयांची प्रक्रिया करणाऱ्या सिस्टम हॅल करण्याचा प्रयत्न केल्याचे उघड झाले आहेत.

# महिलांच्या उद्धारक पंडिता रमाबाई



**निमित्त**

पंडिता रमाबाई यांचा आज स्मृतिदिन. पंडिता रमाबाई म्हणजे स्त्रियांच्या–विशेषतः परित्यक्त्या, पतिता व विधवांच्या–सर्वांगीण उद्धाराकरिता समर्पित भावनेने कार्यरत राहिलेल्या महाराष्ट्रीय विदुषी होत्या. त्यांचा जन्म २३ एप्रिल १८५८ रोजी मंगलोरजवळ माळहेरंजी येथे राहणाऱ्या अंबाबाई आणि अनंतशास्त्री डोंगरे या दाम्पत्यापोटी झाला. अनंतशास्त्री हे त्या काळी स्त्रियांच्या बाबतीत पुरोगामी विचारांचे होते. रमाबाईंना त्यांनी वेदादींचे शिक्षण दिले तसेच रमाबाई नऊ वर्षांच्या झाल्या, तरी त्यांचे लग्न करून दिले नाही म्हणून ज्ञातिबांधवांनी त्यांना वाळीत टाकले. आई–वडिलांना लोकांच्या त्रासामुळे सर्व मुलांना घेऊन तीर्थयात्रेला पायी निघावे लागले. या तीर्थयात्रेच्या १५–१६ वर्षांच्या कालखंडात रमाबाईंना आई–वडिलांपासून, विशेषतः आईकडून, संस्कृत व्याकरण व साहित्याचे शिक्षण मिळाले.

रमाबाईंनी संस्कृतमध्ये तर प्रावीण्य मिळविले होतेच; पण मराठी, हिंदी, बंगाली आणि कन्नड भाषाही त्या अस्खलितपणे बोलू शकत होत्या. १८७८ साली त्यांचे बंधू श्रीनिवासशास्त्री यांच्यासह प्रवास करीत त्या कोलकात्याला आल्या. तेथे मात्र त्यांच्या विद्वत्तेचा व बुद्धिमत्तेचा उचित गौरव झाला. कोलकात्याच्या सिनेट हॉलमध्ये त्यांना 'पंडिता' व 'सरस्वती' या बिरुदावली बहाल करण्यात येऊन त्यांचा गौरव करण्यात आला. 'पंडिता' नावाने ओळखल्या जाणार्या रमाबाई या आज एकमेव महिला होत.

बंगाली स्त्रियांनीही त्यांना 'भारतवर्षीय स्त्रियांचे भूषण' म्हणून मानपत्र दिले. बाल–विवाह, पुनर्विवाहास बंदी इ. घातक चालीरीती व दुष्ट रुढी यांतून समाजास मुक्त करण्याच्या उद्देशाने त्यांनी प्रथम पुणे येथे व नंतर अहमदनगर, सोलापूर, ठाणे, मुंबई, पंढरपूर, बार्शी इ. ठिकाणी 'आर्य महिला समाजा'ची स्थापना केली. स्त्रीधर्मनीति (१८८२) हे पुस्तक त्यांनी लिहिले. अत्यंत बुद्धिवान असलेल्या रमाबाईंचे अंतःकरण अत्यंत उदार व दीनदुबळ्या स्त्रियांकरिता सतत तळमळणारे होते. अशा या महान समाजसेविकेचे ५ एप्रिल १९२२ रोजी निधन झाले.

पंडिता रमाबाईंनी स्थापन केलेल्या संस्था :

१) आर्य महिला समाज, पुणे (१८८२) : या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी स्त्रियांच्या स्थितीबद्दल जागृती केली.या संस्थेच्या शाखा अहमदनगर, सोलापूर, पंढरपूर, बार्शी, ठाणे, मुंबई येथे स्थापन.

२) रमाबाई असोसिएशन : १८८७ साली अमेरिकेतील बोस्टन शहरात रमाबाईंनी ही संस्था स्थापन केली.

३) शारदा सदन (शारदाश्रम), मुंबई : १८८९. या संस्थेमार्फत निराश्रित विधवा, अनाथ स्त्रियांच्या निवासभोजनाची व्यवस्था. १८९० मध्ये शारदा सनदचे पुणे येथे स्थलांतर व काही काळाने केडगाव येथे स्थलांतर. पुण्यात ही संस्था नावारूपास आली.शारदा सदनचे सल्लागार : न्या. रानडे, न्या. के. टी. तेलंग, डॉ. भांडारकर.

४) मुक्ती सदन, केडगाव : १८९६. या संस्थेमार्फत अनाथ, विधवा स्त्रियांचे शिक्षण, निवास–भोजनाची व्यवस्था.पतित स्त्रियांसाठी 'कृपा सदन', अंध विद्यार्थ्यांची पहिली शाळा 'बातमी सदन', अनाथ मुलांसाठी 'सदानंद सदन', प्रीति सदन, शांती सदन या पंडिता रमाबाईंनी स्थापन केलेल्या अन्य संस्था आहेत. अमेरिकेत त्यांनी बालोद्यान शिक्षण पद्धती शिकून घेतली. व्हॉईसरॉय लॉर्ड डफरीन यांच्या पत्नी लेडी डफरीन यांच्या नावे फंड सुरू करून स्त्रियांसाठी वैद्यकीय सोयी उपलब्ध करून दिल्या.


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# गरम पाणी पिण्याचे 'हे' जबरदस्त फायदे

निरोगी आयुष्य जगण्यासाठी भरपूर पाणी पिणं गरजेचं आहे. पाणी हे आपल्या शरीरासाठी अत्यंत आवश्यक आहे. पाण्याशिवाय जीवन नाही असे म्हटले जाते. पाणी पिऊन दिवसाची सुरुवात करणे आरोग्यदायी ठरते. दररोज योग्य प्रमाणात पाणी प्यायल्याने आपण अनेक आजारांपासून लांब राहू शकतो, त्यामुळे भरपूर पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. उन्हाळ्यात भरपूर पाणी पिणे शरीरासाठी गरजेचे आहे. सतत येणाऱ्या घामामुळे शरीरातील पाणी कमी होते, ज्यामुळे डिहायड्रेशन होते. अशात शरीराला हायड्रेटेड ठेवण्यासाठी भरपूर पाणी पिणे गरजेचे आहे. पण, गरम पाणी पिणे आपल्या शरीरासाठी आणखी चांगले आहे. रोज सकाळी उठल्यावर गरम पाणी पिणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. आयुर्वेदिकतज्ज्ञ डॉ. नीतिका कोहली यांनी गरम पाणी प्यायल्याने आपल्या शरीराला कोणते फायदे मिळतात याविषयी माहिती दिली आहे, त्याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊ..



डॉ. नीतिका कोहली सांगतात की, चांगल्या आरोग्यासाठी दिवसातून पुरेसे पाणी पिणे हे अत्यंत आवश्यक आहे हे सांगायला नको. शरीराचे चयापचय आणि आरोग्य नियंत्रित ठेवण्यासाठी दररोज सुमारे आठ ते १० ग्लास पाणी पिणे आवश्यक आहे. पाणी स्वतःच तुम्हाला निरोगी आणि हायड्रेटेड ठेवते, परंतु गरम पाणी प्यायल्याने तुमच्या शरीरासाठी फायदे आणखी वाढतात!

ज्या लोकांना बद्धकोष्ठतेची समस्या आहे, अशा लोकांनी गरम पाण्याचे सेवन केले तर तुमची पचनशक्ती मजबूत होईल आणि तुम्हाला बद्धकोष्ठतेची समस्या उद्भवणार नाही.

गरम पाणी पिताना त्यातून जी वाफ मिळते, त्यामुळे चोंदलेल्या नाकाला आराम मिळतो आणि बंद नाकाची तक्रारही दूर होते.

गरम पाणी केसांची मुळं सक्रिय करते, ज्यामुळे केसांची वाढ सुधारते आणि ते अधिक मजबूत होतात.

तुमच्या आरोग्यासाठी, विशेषतः तुमच्या मासिक पाळीच्या आरोग्यासाठी हायड्रेटेड राहणं महत्त्वाचं आहे. गरम पाणी प्यायल्याने मासिक पाळीच्या वेदना कमी होण्यास मदत मिळते.

गरम पाणी प्यायल्याने त्वचा शरीराच्या आतून हायड्रेट राहते, ज्यामुळे त्वचा निरोगी आणि चमकदार दिसते.

गरम पाण्याने पचनक्रिया सुधारते आणि पोटातील गॅसची समस्या कमी होते. पचनक्रिया लगेचच सुरू होते आणि शरीरातील विषद्रव्य पदार्थही निघून जाण्यास मदत होते.

# पालीत मान्सूनपूर्व कामांना सुरुवात

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली शहरात नगरपंचायत तर्फे नालेसफाईच्या कामांना सुरुवात झाली आहे. तसेच जवळपास दीड कोटींची गटारे व नाले बांधणीची कामे प्रगतीपथावर आहेत. पावसाळ्यापूर्वी नालेसफाई व गटारे आणि नाले बांधणीची ही सर्व कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. परिणामी पालीत पावसाळ्यात गटारे व नाले तुंबण्याचा धोका नाही.

नगरपंचायत तर्फे भरघोस निधी उपलब्ध करून शहरातील वेगवेगळ्या ठिकाणचे नाले व गटारे नव्याने बांधण्याचे काम काही दिवसांपासूनच सुरू करण्यात आले आहे. अनेक कामे पूर्ण झाली आहेत, तर काही ठिकाणची कामे प्रगतीपथावर आहेत. परिणामी पावसाळ्यात गटारे व नाले तुंबण्याचा प्रश्न कायमचा सुटेल. तसेच येथील दुर्गंधी संपुष्टात येईल. पालीतील नालेसफाईला सुरुवात झालेली आहे ठरलेल्या नियोजनाच्या द्वारे येथील वेगवेगळ्या ठिकाणची नालेसफाई टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येईल. पाणी बॉटल, प्लॅस्टिकच्या पिशव्या, घरगुती कचरा व गाळ यामुळे येथील बहुसंख्य ठिकठिकाणी नाले व गटारे तुंबली आहेत. नगरपंचायत चे सफाई कर्मचारी नियमित नालेसफाई करतात. पावसाळ्यापूर्वी होत असलेली नालेसफाई ही अत्याधुनिक यंत्र व जेसीबीच्या साह्याने अधिकची माणसे घेऊन करण्यात येत आहे. त्यामुळे या तुंबलेली गटारे व नाले पूर्णपणे साफ होतील. तसेच नालेसफाई सुरुवात झाल्याने दुर्गंधी व घाण सर्व समस्या काही दिवसांत मार्गी लागणार आहेत.

नगरपंचायतद्वारे कंत्राटी कामगार घेऊन नालेसफाई केली जात आहे. जेसीबी, ट्रॅक्टर व पारंपरिक साधने आदी साधनांचा वापर करून गटारे व नाल्यातील घाण, कचरा काढला जात आहे. याबरोबरच गटारे व नाल्याभोवती उगवलेले गवत, झाडे झुडपेदेखील काढली जात आहेत.

बहुतांश ठिकाणचे नाले व गटारे नव्याने बांधण्यात आली आहेत. अनेक कामे पूर्ण केली आहेत. तसेच मे अखेर किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत नगरपंचायत हद्दीतील नालेसफाईची कामे पूर्ण होतील.

गटारे व नाले बांधणी आणि नालेसफाईची कामे चांगली व वेळेत व्हावीत यासाठी स्वतः लक्ष देत आहे. तसेच स्वच्छता सभापती व नगरसेवकदेखील या कामांवर लक्ष ठेऊन आहेत. नागरिकांनी आवाहन आहे की त्यांनी प्लास्टिक बॉटल, पिशव्या व घरातील कचरा गटारे किंवा नाल्यात टाकू नये, असे पाली नगरपंचायत नगराध्यक्षा प्रणाली सूरज शेळके यांनी सांगितले.



### काम, खर्च आणि सद्यस्थिती

*स्वामी समर्थ नगर गटार – २५ लक्ष (काम पूर्ण)*
*रोहिदास नगर गटार – १० लक्ष (काम पूर्ण)*
*प्रबुद्ध नगर गटार – १० लक्ष (काम चालू)*
*गणेश नगर गटार – १० लक्ष (काम पूर्ण)*
*बल्लाळेश्वर नगर गटार – १० लक्ष (काम पूर्ण)*
*गणेश शिंदे ते तहसील कार्यालय गटार – २० लक्ष (काम चालू)*
*बल्लाळेश्वर नगरातील देशमुख ते शिंदे गटार – १० लक्ष (काम चालू)*
*खडक आळी गटार – १० लक्ष (काम पूर्ण)*
*दोषी डॉक्टर येथील गटार – १० लक्ष (काम चालू)*

# मुंबई–गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी

## तीन ते चार किलोमीटर रांगा; प्रवाशांचा खोळंबा

**पाली : प्रतिनिधी**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग हा प्रवासी व वाहन चालकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. रविवारी (दि.४) सकाळी दहा वाजल्यापासून इंदापूर व माणगाव येथे वाहनांच्या तीन ते चार किलोमीटर लांब रांगा लागल्या होत्या. ही वाहतूक कोंडी केवळ एक दिवसासाठी आहे असे नाही तर रोजच प्रवाशी, रुग्ण, वाहनचालक व पर्यटकांना वाहतूक कोंडीने रडकुंडीला आणले आहे. वाहतूक कोंडीने प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. तब्बल दोन ते तीन तास प्रवाशांचा खोळंबा झाला. त्यामुळे प्रवाशांना मनस्ताप झाला.

मुंबई–गोवा महामार्गाचे सुरू असलेले काम आणि परिणामी या ठिकाणी झालेला अरुंद रस्ता तसेच नियमांचे उल्लंघन करून पुढे जाणारे वाहन चालक यामुळे वाहतूक कोंडी अधिक जटील झाली होती. महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त अनेक जण कोकणाकडे फिरण्यासाठी निघाले होते, मात्र मुंबई गोवा महामार्गामुळे त्यांचा मोठा हिरमोड झाला. इंदापूर व माणगाव येथे जवळपास चार ते पाच किलोमीटर लांब वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. त्यामुळे जवळपास दोन ते तीन तास वाहन चालकांना व प्रवाशांना खोळंबावे लागले.

अनेक वाहन चालक हे मार्गिका सोडून पुढे जात होते. तर काही वाहने हे दुसऱ्या मार्गे केवर जात होते. त्यामुळे वाहनांच्या जवळपास दोन ते पाच लेन झाल्या परिणामी पुढून येणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण झाला. त्यामुळे वाहतूक कोंडी अधिकच जाटील झाली. याबरोबरच वाटेत अनेक जणांची वाहने एकमेकांना धडकली देखील.

यामुळे काही वाहनचालकांमध्ये भांडणदेखील झाले. तसेच काही वाहने बिघडलीदेखील.



## निवडक

### सावरोली गावाजवळ झोपडीला आग



**खालापूर :** मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गाला जोड मार्ग असणाऱ्या रस्ता लगत सावरोली गावाजवळ असणाऱ्या झोपडी वजा घराला आग लागली. घरा लगत असणारे गवत, कचरा व साठवून ठेवलेल्या मालाने पेट घेतला आगीने रौद्ररूप धारण केले घटनेची माहिती मिळताच खोपोली अग्निशमन दल व टाटा स्टील कंपनीचे अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळवले.

### रामनाथ पाटील यांना सेवानिरोप

**नागोठणे :** रायगड जिल्ह्यात अग्रमान्य असलेल्या संस्थेच्या कोकण एज्युकेशन सोसायटीचे मेहेंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय रोहा येथील कलाशिक्षक रामनाथ पाटील हे तब्बल ३३ वर्षांच्या प्रदीर्घ अशा सेवेनंतर निवृत्त झाले. यानिमित्त त्यांचा सेवापूर्ती निरोप समारंभ सोहळा मेहेंदळे हायस्कूलच्या दांडेकर हॉलमध्ये आयोजित केला होता. या वेळी सत्कारमूर्ती रामनाथ पाटील यांना शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ, भेटवस्तू तसेच सन्मानपत्र देऊन प्राचार्य रमेश मोसे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



# पोलादपूरमध्ये एकाची दारूच्या नशेत आत्महत्या

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील पितळवाडी गावातील ५९ वर्षीय व्यक्तीने दारूच्या नशेत घरातील बेडरूममध्ये लोखंडी पाईपाला साडी बांधून गळफास लावून आत्महत्या केली आहे. शनिवारी ३ मे रोजी सकाळी ८ ते १२ दरम्यान ही घटना घडली आहे

मयत काशिनाथ शंकर चव्हाण (वय ५९) यांना गेल्या पाच वर्षांपासुन दारू पिण्याचे अतिव्यसन असल्याने त्याने दारुचे नशेत त्याचे राहत्या घरातील बेडरूममध्ये लोखंडी पाईपाला साडी बांधून स्वतःला गळफास घेत आत्महत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी पोलीस ठाण्यात सागर काशिनाथ चव्हाण (वय ३३ वर्षे, रा. पितळवाडी सध्या रा.खांबेश्वरवाडी, वाकण) यांनी फिर्याद दिली.

पोलादपूर पोलिसांनी अकस्मात मृत्यू नोंद ०७/२०२५ केली आहे या प्रकरणी अधिक तपास पोलीस हवालदार नितेश कोंढाळकर हे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपास करत आहेत.

# ॲपे रिक्षाची डंपरला धडक; तरुणाचा मृत्यू

**तळा : प्रतिनिधी**

ॲपे रिक्षाने डंपरला धडक दिल्याने अपघात झाला असून त्यात एका प्रवाशाचा मृत्यू झाला आहे. भैरव विमलराज मेहता यांच्या ताब्यातील डंपर (एमएच ४६ एएफ ६४४८) हा आनंदवाडी बस स्थानकाच्या पुढे साधारण १०० मीटर अंतरावर डाव्या बाजूला कोणतीही लाईट तसेच चिन्ह न लावता अंधारात उभा करून ठेवला होता. निलेश तावडे (रा. परिट अळी) हा ॲपेरिक्षा धारक (एमएच ०६ झेड २५२३) तळा ते बोरघर चालवत असताना डंपरला जोरदार धडक दिल्याने अपघात घडला असून अपघातात प्रवासी राहुल अशोक पवार (वय ३५) याला गंभीर स्वरूपाची दुखापत झाली.

पवार यास ग्रामीण रुग्णालय तळा येथे दाखल करण्यात आले, परंतु उपचारादरम्यान राहुल पवार याचा मृत्यू झाला असून या प्रकरणी तळा पोलिस ठाणे येथे आरोपी भैरव विमलराज मेहता (वय ४८ रा. अंबिका नगर) याच्यावर गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास सुरू आहे.

# जुन्या वादाच्या रागातून हाताबुक्क्याने मारहाण

**माणगाव : प्रतिनिधी**

जुन्या वादाच्या रागातून बेकायदेशीर जमाव जमवून हाताबुक्क्याने मारहाण केल्याची घटना माणगाव तालुक्यातील राजिवली येथे घडली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, ३ मे रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास साक्षीदार हे लघवीकरिता गावातील मैदानामध्ये गेले असता आरोपी सदाशिव खडतर, श्रीकांत खडतर, सूर्यकांत खडतर, समीर खडतर, अमित खडतर, नितेश खडतर, दिनेश खडतर, अभिषेक खडतर, राजेश खडतर, संतोष खडतर (सर्व रा. राजिवली) यांनी मागील भांडणाचा राग मनात धरून बेकायदेशीर जमाव गोळा करून साक्षीदार यांना हाताबूक्यांनी मारहाण करून शिवीगाळ व दमदाटी केली. तसेच भांडणे सोडविण्याकरिता फिर्यादी प्रदिप अर्बन साक्षीदार या गेल्या असता त्यांनासुद्धा हाताबुक्क्यांनी मारहाण केली.

या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाणे येथे करण्यात आले असून पुढील तपास पो. नि. निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. ह. लहाने करीत आहेत.

# जमीन खरेदी–विक्रीत फसवणूक टाळण्यासाठी आज म्हसळ्यात कार्यशाळा

**म्हसळा : प्रतिनिधी**

जमीन खरेदी देणार व खरेदी घेणार यांच्यामधील फसवणूक न होण्याच्या दृष्टीकोनातून, जमीन खरेदी देणार व खरेदी घेणार यांना एक व्यासपीठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने तहसिल कार्यालय म्हसळा यांच्या माध्यमातून सोमवारी (दि.५) सकाळी १० वा कार्यशाळेचे आयोजन तहसीलदार सचिन खाडे यांनी केले आहे. यासाठी जमीन खरेदी विक्रीसाठी इच्छुक नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन तहसीलदार खाडे यांनी केले आहे.

या कार्यशाळेस म्हसळा तालुका दुय्यम निबंधक, उप अधिक्षक भूमी अभिलेख म्हसळा यांचे कार्यालयाकडील निमतानदार, सर्व मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) हे उपस्थित राहणार आहेत. तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी यांच्यावर योग्य मार्गदर्शन करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली असून त्यामध्ये प्रामुख्याने खरेदी व विक्री जमिनी सबंधी कागदपत्रांची सत्यता पडताळणे, जमीन विक्रेता यांची सत्यता पडताळणे, आवश्यक असणारे ७/१२ व फेरफार जमीन खरेदी विक्रीसाठी इच्छुक नागरीक यांना देणे. सदर कार्यशाळेत म्हसळा तालुक्यातील गावांच्या नावाचा पुकारा केला जाईल त्याप्रसंगी वेळी त्या त्या गावातील जमीन विक्री करणारे व इच्छुक खरेदीदार यांना समोर बोलावून तद्नंतर सबंधित गावचे ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांचे टेबलकडे पाठविले जाईल.

ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) जमीन खरेदी देणार व जमीन विकत घेणार यांच्या शंकांचे सदर क्षेत्राबाबत समाधान करतील.दुय्यम निबंधक व उप अधिक्षक भूमी अभिलेख यांचेशी सबंधित विषयास अनुसरून उपस्थित अधिकारी मार्गदर्शन करतील तद्नंतर जमीन खरेदी देणार व जमीन खरेदी घेणार हे त्यांच्यातील आपसी समझोत्याद्वारे व त्यांना योग्य वाटेल अशा रकमेस सदर क्षेत्राचा व्यवहार करतील असे म्हसळा तहसीलदार सचिन खाडे यांच्या कडून सांगण्यात आले. महसूल विभागाच्या या महत्त्वाकांक्षी या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना कर्ज, जमीन व्यवहार आणि शासकीय योजनांच्या लाभ घेण्यात येणाऱ्या अडथळ्यांपासून मुक्ती मिळणार आसल्याच्या बोलक्या प्रतिक्रिया शेतकऱ्यांकडून येत आहेत.


**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन – ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई–मेल: coud.kulgaonbadalapur @maharashtra.gov.in, वेबसाइट: kbmc.gov.in.

जा.क्र. कुबनप/नगरोत्थान/ साबां/१४३/२०२५–२०२६ दिनांक : २८/०४/२०२५

**ई–निविदा सूचना क्रमांक–७/२०२५–२०२६**

कुळगांव–बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२४–२५ करिता प्रशासकीय मंजूर प्राप्त झालेल्या ११ विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई–निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई–निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. ०५/०५/२०२५ ते दि.१३/०५/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत असून दि.१३/०५/२०२५ रोजी दुपारी. १२.०० वा निविदा पुर्व बैठक नगरपरिषद कार्यालयात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई–निविदा दि. १४/०५/२०२५ रोजी दुपारी. १२.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सही/–
(मारुती गायकवाड)
मुख्याधिकारी तथा
प्रशासक
कुळगांव बदलापूर नगरपरिषद, कुळगांव


# सायकलभ्रमण करणाऱ्यांचे खारापटी येथे स्वागत

**रोहा : प्रतिनिधी**

मुंबई ते कन्याकुमारी सायकलभ्रमण करणाऱ्या सायकलस्वरांचा खारापटी येथे नवनीतदादा डोलकर यांच्या कडून स्वागत करण्यात आले असून सायकल स्वार सायकल भ्रमण दरम्यान स्वच्छ भारत, प्लास्टिक मुक्ती, व्यसनमुक्ती आणि पर्यावरण सवर्धनचा देणार संदेश देणार आहेत.

भारत मातेच्या रक्षणासाठी बॉर्डरवर सैनिक तैनात आहेत. आपणही काहीतरी देशासाठी केले पाहिजे. देशासाठी, माझ्या भारत भूमिसाठी काहीतरी करण्याचे संकल्पना घेऊन मुंबई चुनाभट्टी येथून महाराष्ट्र दिनाच औचित्त साधून सान्वी पाटील (११ वर्ष, अर्णव भोईणकर (१२ वर्ष) व सोबतीला प्रवीण पाटील (४६ वर्ष) यांनी स्वच्छ भारत, प्लास्टिक मुक्ती, व्यसनमुक्ती आणि पर्यावरण सवर्धनाचा संदेश जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी मुंबई ते कन्याकुमारी सायकल भ्रमण सुरू केले आहे.

या सायकलस्वरांचा रोहा तालुक्यातील खारापटी गावातील सामाजिक कार्यकर्ते, कोळी समाजाचे नेते नवनीत डोलकर, ग्रुप ग्रामपंचायत निडी तर्फे अष्टमी ग्रामपंचायत सदस्य नयनिता नवनीत डोलकर, चंद्रकांत कारभारी, काशिनाथ नाईक, संगीता प्रवीण जोशी, शितल सुहास कारभारी व डायला यांनी खारापटी गावातील हनुमान मंदिरात स्वागत करून त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुछ देऊन सन्मानित केले व त्यांना पुढील प्रवासासाठी सुखमय व प्रवास आनंददाई होण्यासाठी शुभेच्छा व आशीर्वाद दिले आहे.



# माणगाव जत्रा महोत्सवात स्पर्धकांना पारितोषिक वाटप



**माणगाव : बातमीदार**

माणगाव जत्रा महोत्सव २०२५मध्ये माणगांव आयडॉल २०२५ या गाणी, डान्स आणि अभिनय स्पर्धेत प्रथम प्रथमेश महाडिक, महाड (गायन), व्दितीय वृतिका शिंदे, पाली (डान्स), तृतीय राजवीर मोरे, माणगांव (अभिनय) आणि उत्तेजनार्थ चतुर्थ गायत्री सुतार, महाड (गायन) यांनी पारीतोषिक पटकावला.

विजेत्यांना पारितोषिक वितरण समारंभात माणगांव मधील सुप्रसिद्ध उद्योजक सचिन देसाई, रामनारायण मिश्रा, अशोक धारीया, सुवर्णा जाधव आणि माणगांव मधील नेत्ररोग तज्ञ डॉ. श्रीकांत वैद्य यांच्या हस्ते शनिवारी (दि.३) गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण चित्रपट अभिनेते नितीन बोधारे, मुंबई आणि माणगांव तालुक्यातील कालवण गांवचा सुपुत्र, चला हवा येवुद्या फेम, प्रसिद्ध बालकलाकार साईराज सांगले याचा विशेष सत्कार या वेळी करण्यात आला.

परीक्षक मानसी राणे (मुंबई), डॉ.मुरलीधर वाणी (माणगांव), निलीमा काप (माणगांव), धीरज रजपुत (माणगांव), राज यादव (लोणेरे), रॉणी पठार (कोलाड) व आलेल्या सर्व प्रमुख मान्यवर, प्रेक्षक व स्पर्धकांचे अष्टविनायक कला अकादमी माणगाव यांच्या तर्फे डॉ. अजय मोरे यांनी आभार मानले.


**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

कार्यालयः ०२२–२७४५८०४०/४१/४२ ई–मेल: panvelcorporation@gmail.com
अग्निशमन विभागः ०२२–२७४६९५००० फॅक्स नं.: ०२२–२७४५७३३३

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र. १८५/१९०/२०२५ दिनांक :– ०२/०५/२०२५

**अग्निशमन विभाग**
**अंदाजपत्रक दरपत्रक मागणी सूचना**

याव्दारेचे सर्व संबंधित व्यवसायिक, कंत्राटदार, संस्था यांना सूचित करण्यात येते की, पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकरिता ''Integrated GIS based Intelligent Fire safety Management System'' विकसित करण्याकरिता अंदाजपत्रक दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदर प्रणालीमध्ये अग्निशमन विभागातील सर्व संबंधित माहितीचे संकलन व सर्वेक्षण, स्मार्ट डॅशबोर्ड विकसित करणे, तसेच व्यवस्थापन माहिती प्रणाली (MIS) यांचा समावेश असावा. यामध्ये घटनांची नोंद, ऑडिट ट्रेल्स, मोबाईल ॲप सुसंगतता आणि वापरकर्त्यांना प्रशिक्षण देणे, यासोबतच चार वर्ष कालावधीसाठी देखभाल सेवा पुरविणे अपेक्षित आहे.

या कामास इच्छुक असलेल्या पात्र एजन्सींनी आपले दरपत्रक बंद लिफाफ्यात सादर करावेत. सदर कामाचे तांत्रिक तपशील व इतर अटी व शर्ती www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाशी संपर्क साधावा.

सही/–
(कैलास गावडे)
उपायुक्त मुख्यालय ( I )
पनवेल महानगरपालिका

## निवडक



### सफाई, उद्यान कामगारांचा सत्कार

**नवी मुंबई :** जागतिक कामगार दिनाच्या निमित्ताने नेरूळमध्ये युवा फाऊंडेशनचे अध्यक्ष स्वप्नील घोलप यांच्या वतीने नवी मुंबई महापालिका सफाई कामगार व उद्यान कामगार यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी उपस्थित कामगारांना अल्पोपहार देण्यात आला. नवी मुंबई शहर स्वच्छ आणि सुंदर शहर म्हणून गणले जाते याचे सर्व श्रेय या सफाईदुताना जाते. म्हणूनच आपल्या नवी मुंबई महानगर पालिकेला अनेक स्वच्छ शहराचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत, असे स्वप्नील घोलप यांनी बोलताना सांगितले. सर्वश्री उदय सालवी, संतोष थोरात, दिनेश सोनवने, गजानन जाधव यांसह कामगार उपस्थित होते.

### डॉक्टर्स असोसिएशनतर्फे महाराष्ट्र दिन



**नवी मुंबई :** खारघर डॉक्टर्स असोसिएशन दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महाराष्ट्राची दिन सोहळा मोठ्या जल्लोषात व उत्साहात पार पडला. परंपरा, संस्कृती व खारघर डॉक्टर्स असोसिएशनची सामाजिक बांधिलकी जपणारा हा उपक्रम एमओसी कॅन्सर केअर व रिसर्च सेंटर पनवेल ह्यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला होता. खारघर डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अनिल भाले यांनी मोडेन पण वाकणार नाही असा महाराष्ट्राचा बाणा व ऐकामेका साहय करुरू अवघे धरू सुपंथ हा खारघर डॉक्टर्स असोसिएशन चा पायाभूत विचार मांडला. सचिव डॉ. ज्योती पचौरी ह्यांनी विशेष वेशभूषेत आलेल्या चिमुकल्यांचे कौतुक केले, खजिनदार डॉ. शालिनी गोरे ह्यांनी सूत्रचंलालन व आभार प्रदर्शन केले. अनेक पदाधिकारी व मान्यवर सदस्य मंडळी उपस्थित होते.

### महावितरण कर्मचाऱ्यांना पुरस्कार



**कल्याण :** महावितरणच्या कल्याण परिमंडल कार्यालयात गुरुवारी महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा झाला. कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तर जागतिक कामगार दिनानिमित्त वर्षभरात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या ५० उत्कृष्ट तांत्रिक कर्मचाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून गौरवण्यात आले. या वेळी अधीक्षक अभियंता दीपक पाटील, महेश अचिंनमाने, मोहन काळोगे, सहायक महाव्यवस्थापक सुशिल पावसकर, कार्यकारी अभियंता नितीन काळे, मिलींद चौधरी, सुनील वनमोरे आदी उपस्थित होते.

# खारघरमध्ये ट्राफिक पार्कचे लवकरच भूमिपूजन

**पनवेल : वार्ताहर**

शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींना वाहतुकीची माहिती व्हावी, सिग्नल यंत्रणा समजावी आदींसह वाहतुकीचे नियम विद्यार्थी-विद्यार्थिनींना बालपणापासून अंगवळणी पडावेत या उद्देशाने पनवेल महापालिकेतर्फे खारघर सेक्टर ३५मध्ये ट्रॅफिक पार्क उभारण्यात येणार असून येत्या मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात या ट्राफिक पार्कचे भूमिपूजन होणार आहे.

पनवेल आणि नवी मुंबई परिसरात प्रथमच ट्राफिक पार्क उभारण्यात येणार असल्यामुळे या ट्राफिक पार्कमध्ये शालेय विद्यार्थ्यांची रेलचेल असणार आहे. पनवेल महापालिका हद्दीत प्रथमच आणि सर्वात मोठे उद्यान असलेले ट्राफिक पार्क उभे राहणार असल्यामुळे खारघर मधील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे. सिडकोने खारघर वसाहत निर्माण करताना सेक्टर २, सेक्टर २१ परिसरात सेक्टरनिहाय उद्यान आणि खेळाचे मैदान विकसित केले आहे, मात्र उंच इमारतीचा परिसर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खारघर सेक्टर ३० ते सेक्टर ३६ परिसरात उद्यान आणि खेळाचे मैदान विकसित करण्याकडे सिडकोने दुर्लक्ष केले. पनवेल महापालिका आस्तत्वात आल्यावर खारघर सेक्टर ३५ एफ, प्लॉट नंबर-९ ए मधील ९ हजार चौरस मीटर जागेत १५ कोटी ८१ लाख २५ हजार रुपये खर्च करुन महापालिकेतर्फे ट्राफिक पार्क उभारले जाणार आहे. या ट्राफिक पार्कमध्ये लहान मुले-मुलींसाठी वाहतुकीचे नियम, वाहतूक व्यवस्थापन या विषयी मार्गदर्शन केले जाणार आहे.



यासाठी एक क्लासरुमही सुरु केली आहे.

वाहन कसे चालवावे याची माहितीदेखील दिली जाणार आहे तसेच दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी ड्रायव्हिंग ट्रॅक, वाहतुकीच्या नियमाचे धडे देणारे खेळाचे मैदान, रोड क्रॉसिंग, रेल्वे, रेल्वे स्थानक, क्लॉक टॉवर, व्यासपिठ, पिण्याचे पाणी, बस थांबा, स्थिर रेल्वे ट्रॅक, पेट्रोल पंप, रुग्णालय,पोलीस ठाणे, तिकीट घर, सुरक्षा कॅबिन, शाळा, पदपथ, उद्यानात बसण्यासाठी सोय, इलेक्ट्रिक मोटार बाईक आणि कारसह सायकल ट्रॅक, ॲम्पिथिएटर, पादचारी पूल, बफर झोन, पोलिसांचे शिल्प, शिल्प कलेतील पुरुष, पाम ट्री अव्हेन्यू, गुरांचे शिल्प अभिमुखता केंद्र, आर्कषक गेट, लहान मुलांसाठी खेळाचे मैदान, सायकल ट्रॅक, बच्चे कंपनीसाठी आकर्षक खेळणी, संध्याकाळी जॉगिंग ट्रॅकवर फेरफटका मारण्यासाठी गेल्यानंतर खाण्याचा मोह झाल्यास फूड कोर्ट, आकर्षक उद्यान, रंगीबिरंगी फुलांची नजरेच्या टप्प्यात सामावणारी उद्यान अत्याधुनिक स्वरुपाची महिला आणि पुरुषांसाठी शौचालय आदी सुविधा ट्राफिक पार्कमध्ये असणार आहेत. सेंट्रल पार्कनंतर पनवेल आणि नवी मुंबईतील पहिले ट्राफिक पार्क असल्यामुळे या ठिकाणी शालेय विद्यार्थ्यांची रेलचेल असणार आहे.

> **पनवेल महापालिका आयुक्तांच्या मार्गदर्शनानुसार खारघरमध्ये उभारल्या जाणाऱ्या ट्राफिक पार्कचे भूमिपूजन येत्या मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होणार आहे. दोन वर्षात उद्यानाचे काम पूर्ण केले जाणार आहे. पनवेल आणि नवी मुंबई महापालिका हद्दीतील हे पहिले ट्राफिक पार्क असणार आहे. लहान मुले मुली आणि पालकांसाठी आकर्षक असे ट्राफिक पार्क असणार आहे.**
> **-राजेश कर्डीले, उपअभियंता, पनवेल महापालिका**

# दिवाळे गावात ठळक मार्गफलक बसविण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई, पनवेल, उरण भागात बिहिरीनाथ देवस्थानासाठी दिवाळे गाव प्रसिद्ध आहे, मात्र या प्रसिद्ध गावातील रस्त्यांच्या नामफलाकडे पालिकेचे दुर्लक्ष झाले आहे. वर्षानुवर्ष हे जुनाट नामफलक तसेच असून, शहर टापटीप करताना मात्र गावांतील समस्यांकडे व सौंदर्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे या निमित्ताने दिसून येत आहे. त्यामुळे ग्रामस्थ नाराजी व्यक्त करत असून, गावाकडेदेखील पालिकेने लक्ष देऊन गावाची ओळख तसेच गावासाठी अभिमानास्पद बाब असणारे नामफलक ठळक अक्षरात नव्याने बसवावेत, अशी मागणी दिवाळे गावातील ग्रामस्थ प्रेमेश बोस यांनी पालिकेकडे केली आहे.




समुद्र किनारी वसलेल्या दिवाळे गावाला ऐतिहासिक महत्व आहे. बहिरीनाथ देवामुळे या गावाला आख्यायिका आहे. गावदेवी जवळच्या प्रमुख रस्त्याला गावचे आराध्यदैवत भगवान श्री. बहिरींनाथांचे नाव म्हणून मार्गाला भगवान श्री. बहिरींनाथ मार्ग असे नाव देण्यात आले आहे. तर गावच्या काकादेव ते मासळी बाजाराकडच्या रस्त्याला गावातील भारतीय सैन्य दलात देशाची सेवा करणारे गावातील सैनिक कै.सुकीर मन्या कोळी मार्ग) असे नामकरण केलेले आहे. तसेच गावातील खन्ना हॉस्पिटलजवळच्या रस्त्याला गावातील भारतीय सैन्य दलात देशाची सेवा करणारे गावातील सैनिक कै.कृष्णा सोमा कोळी मार्ग असे नामकरण केले आहे.

पालिकेने बसविलेल्या नमाफलकाकडे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे नामफलकांची अत्यंत दयनीय अशी अवस्था झाली आहे. खन्ना हॉस्पिटलकडच्या मार्गाचा नामफलक नाहीसा झाला आहे. मुख्य म्हणजे इतरवेळी पालिका अनावश्यक कामांवर खर्च करत असते. गावाचा इतिहास असलेल्या नामफलकाकडे दुर्लक्ष केले जात आहे. नव्याने गावात आलेल्या नागरिकांना तसेच वाहनचालकांची प्रचंड गैरसोय आणि दिशाभूल होत आहे. एकीकडे गावाशेजारील गावांच्या रस्त्यांना नवीन अद्ययावत नामफलक बसविण्यात आलेले आहेत, तर गावाबाबत मात्र पालिकेची उदासीनता दिसून येत आहे. पालिकेने या तिन्ही रस्त्यांना नवीन अद्ययावत मार्गफलक बसविण्यात यावेत व या तिन्ही रस्त्यांना दिलेल्या नावाचा योग्य सन्मान राखावा, अशी मागणी प्रेमेश बोस यांनी पालिकेकडे केली आहे.

# पनवेलमध्ये सात दिवस होणार अभिनय प्रशिक्षण शिबिर

### महापालिका व अ.भा. नाट्य परिषद शाखेचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने १९ मे ते २५ मे असे सात दिवसांचे अभिनय प्रशिक्षण शिबिर घेण्यात येणार आहे.

पनवेल महापालिका हद्दीतील नाट्य कलाकारांना मोठे व्यासपीठ मिळावे व त्यांमधून पनवेलचे नाव राज्यात सर्वत्र पोहचावे याकरिता नाट्य परिषद विविध उपक्रम सातत्याने राबवित असते. सध्या सुट्टीचे दिवस असल्याने युवा नाट्यकर्मीना अभिनय प्रशिक्षणास वेळ मिळु शकतो. अभिनय प्रशिक्षण शिबिराचा मोठा फायदा पनवेलमधील कलावंतांना होईल, असे परिषदेचे उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी म्हटले आहे.

**दोन गटात शिबिर**

अभिनय प्रशिक्षण शिबीरासाठी दोन गट निश्चित करण्यात आले आहेत. यात पहिला गट विभाग म्हणजे वय वर्षे ८ ते १६ हा युवा गट व प्रौढ गट म्हणजे १६ ते ६० वयांपर्यंत यात सहभाग घेता येईल प्रत्येक गटासाठी हे शिबिर पूर्णपणे मोफत आहे. संख्या मर्यादेमुळे प्रथम येणाऱ्या ३०-३० नाट्यकर्मींना यात प्रवेश दिला जाणार जाईल. महापालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शिबीरांचे आयोजन होणार आहे. युवा गटासाठी सकाळी ९ ते १२ व प्रौढ गटासाठी दुपारी २ ते ५ अशी वेळा असतील. नाट्य, सिने क्षेत्रातील मान्यवरांकडून शिबिरात मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच शेवटी सर्वांचे सादरी करण होईल. सर्व शिबिरांर्थीना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या शिबिरासाठी आपली नाव नोंदणी १४ मे २०२५ पर्यंत करावी, असे आवाहन पनवेल महापालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या वतीने करण्यात येत आहे.

संपर्क : शिबिरात सहभागी होण्यासाठी संबंधितांनी पुढील क्रमांकावर अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा.

१. शामनाथ पुंडे- प्रमुख कार्यवाह- नाट्य परिषद पनवेल शाखा. ९८२१७५८१४७

२. श्रीमती गांधी ९३२३४८९६९३

३. वर्षा कुलकर्णी - जनसंपर्क अधिकारी पनेवल महापालिका. ७७१५८१५१२७

# प्रशिक्षणार्थींचा गौरव; नवीन वर्गांचा शुभारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पालिका व ऑल इंडिया इन्स्टिट्यूटच्या संयुक्त विद्यमानाने शहरातील महिला, युवतींसाठी ४० प्रकारच्या विविध कोर्सेस मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या योजना केवळ कागदावरच न ठेवता प्रत्यक्षात मार्गदर्शन करून अनेक युवतींना संधी देत त्यांना स्वावलंबी करण्याचे काम नेरूळ शिरवणे येथील भाजपच्या माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी केले आहे.



ब्युटीशियन, फॅशन डिझायनिंग व हॅन्ड वर्कच्या प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थीना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर इतर दोन वर्ग आरी वर्क व बेसिक शिवणकाम या नवीन वर्गाचा शुभारंभ करण्यात आला.

माधुरी सुतार आणि समाजसेवक जयेंद्र सुतार यांच्या प्रयत्नाने मागील दोन वर्षांपासून आत्तापर्यंत ४००हून अधिक महिलांनी विविध प्रकारच्या कोर्स प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे.

पालिकेच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगारांची संधी देण्यात आली आहे. याचा लाभ घेऊन महिला, युवती स्वतःचा रोजगार निर्माण करून शकतात. याचा ज्यांना लाभ घ्यायचा आहे. त्यांनी भारतीय जनता पक्ष जनसंपर्क कार्यालय, शिरवणे गाव येथे संपर्क साधण्याचे आवाहन माधुरी सुतार यांनी केले आहे.

# प्रभातफेरीतून पर्यावरणविषयक जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून महापालिका क्षेत्रातील ४३४ प्राथमिक शाळांमध्ये प्रभात फेरीच्या स्वरूपात राबविण्यात आला. ज्यामध्ये दीड लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभागी होत आपापल्या शाळा परिसरात वसुंधरा संरक्षण-संवर्धनाविषयी व्यापक जनजागृती केली.

सकाळच्या सत्रात काढण्यात आलेल्या या प्रभात फेऱ्यांमध्ये पर्यावरण विषयक जनजागृतीपर फलक उंचावत, घोषणा देत विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय परिसरातील नागरिकांपर्यंत वसुंधरा रक्षणाचा व संवर्धनाचा संदेश पोहचविला. या प्रभात फेऱ्यांमध्ये प्राथमिक माध्यमिक दोन्ही विभागाचे




सर्व व्यवस्थापन व सर्व माध्यमातील शाळांचे एकूण एक लाख ७७ हजाराहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

२२ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगभरात 'जागतिक वसुंधरा दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे महत्त्व शाळांतील विद्यार्थ्यांनी प्रभात फेरीतून नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहचवले. प्रभात फेरीमध्ये अनेक ठिकाणी विद्यार्थी व शिक्षकांसह शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षणप्रेमी नागरिक, ज्येष्ठ नागरिक व पालक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.

प्रभातफेरी झाल्यानंतर सर्वांनी मिळून पर्यावरण संवर्धन विषयक सामुहिक प्रतिज्ञा ग्रहण केली. यावेळी शिक्षकांनी तसेच उपस्थित पर्यावरणप्रेमी नागरिकांनी विद्यार्थ्यांना वसुंधरा रक्षणासाठी झाडे लावण्याचे व त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन केले. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या वाढदिवसाच्या दिवशी एक झाड लावून त्याची देखभाल करण्याविषयी ज्येष्ठ नागरिकांनी मार्गदर्शन केले.

जागतिक वसुंधरा दिनी लोकसहभागातून निसर्ग रक्षणाचा संदेश शाळा-शाळांतून विद्यार्थ्यांमार्फत प्रसारित करण्यात आला.

### क्लिक...क्लिक...!



**मुरुड : मासेमारी करून मिळालेला जवळा राजपुरी परिसरात रस्त्यावर कडक उन्हात सुकविला जातो.** (छाया : सुधीर नाझरे)

# चाणक्य खाडीकिनाऱ्याची स्वच्छता

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने सूचित करण्यात आल्याप्रमाणे महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली २२ एप्रिल या जागतिक वसुंधरा दिनी दिवाळे येथील खाडीकिनारा परिसराची स्वच्छता करण्यापासून विशेष उपक्रम राबविण्यास सुरूवात करण्यात आलेली आहे.

तशाच प्रकारचा स्वच्छता उपक्रम नुकताच अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली महापालिका अधिकारी, कर्मचारी, स्वच्छताकर्मी यांनी बेलापूर विभाग कार्यक्षेत्रातील टी.एस. चाणक्य खाडीकिनारा परिसरात



इंडियन मरीन इन्स्टिट्युटच्या विद्यार्थ्यांसमवेत राबविला. या विशेष स्वच्छता मोहिमेत खाडीकिनारा तसेच किनाऱ्यावरील खारफुटी भागातील प्लास्टिक, थर्माकॉल, कागद असा कचरा गोळा करण्यात आला. यामध्ये परिसरातील नागरिकही उत्साहाने सहभागी झाले होते.

या वेळी उपस्थितांनी स्वच्छता मोहीम राबविल्यानंतर घनकचरा व्यवस्थापन विभाग परिमंडळ १चे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्यासमवेत माझी वसुंधरा अभियानाची सामुहिक शपथ ग्रहण केली. या वेळी बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. अमोल पालवे, कार्यकारी अभियंता राजेश पवार, स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर, स्वच्छता निरीक्षक सर्वश्री विजय नाईक, अजित तांडेल, लवेश पाटील, संजय पाटील, महेश मोरे व रत्नमाला नाईक तसेच स्वच्छताकर्मी आणि इंडियन मरीन इन्स्टिट्युटचे विद्यार्थी व नागरिक सहभागी झाले होते.

# कर्जतकरांचे रेल्वेमंत्र्यांना निवेदन

## ◆ रेल्वेसंबंधी विविध विषय मार्गी लावण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

देशाचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव हे पुणे येथे एका समारंभाला जात असताना कर्जत रेल्वेस्थानकावर थांबले. या वेळी कर्जतकरांनी त्यांची भेट घेऊन त्यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले. आपल्या मागण्यांचा आपण गांभीर्याने विचार करू, असा शब्द रेल्वेमंत्र्यांनी कर्जतकरांना दिला.



रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव शनिवारी (दि. ३) पुणे येथे एका नवीन रेल्वेगाडीचे उदघाटन करण्यासाठी विशेष गाडीने जात होते. दुपारी ३च्या सुमारास ते कर्जत रेल्वेस्थानकात आले. त्यांच्यासमवेत मध्य रेल्वे महाव्यवस्थापक धर्मवीर मीना, विभागीय व्यवस्थापक हिरेश मीना, वाणिज्य अधिकारी ऋषिकुमार शुक्ला होते.

रेल्वेमंत्र्यांचे स्वागत करण्यासाठी भाजप जिल्हा महामंत्री दीपक बेहेरे, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष अतुल बडगुजर, शहर अध्यक्ष राजेश लाड, माजी सभापती तानाजी चव्हाण, ग्रामीण अध्यक्ष दिनेश रसाळ, मंडळ अध्यक्ष नरेश मसणे, वामन वाडेकर यांच्यासह शर्वरी कांबळे, सुषमा ढाकणे, भारती कांबळे, सुरेश खानविलकर, माजी सरपंच प्रमिला बोराडे, शिवसेवक गुप्ता, पंकज ओसवाल, बळवंत घुमरे, बिनिता घुमरे, सुरेश बोराडे आदी उपस्थित होते.

रेल्वेमंत्र्याचे स्वागत झाल्यानंतर कर्जतकरांनी मागण्यांचे निवेदन देऊन त्यांच्याशी चर्चा केली. प्रमिला बोराडे यांनी, बोगदा तयार करताना स्फोट करण्यात आले. त्यामुळे हलिवली परिसरातील घरांना तडे पडले, तर काही घरांचे खूप नुकसान झाले. त्या बाधितांना नुकसानभरपाई द्यावी’, अशी मागणी केली.

सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांनी रेल्वेमंत्री वैष्णव यांच्याशी चर्चा करताना पुण्याहून कर्जतला येण्यासाठी सकाळी ७.५० ते दुपारी ३.२५दरम्यान म्हणजे सव्वा सात तास एकही गाडी नाही असे सांगताच रेल्वेमंत्री वैष्णव यांनी लगेचच सोबत असलेल्या मध्य रेल्वे महाव्यवस्थापक धर्मवीर मीना यांना बोलवून त्यांना याबाबत सूचना केली.

ओसवाल यांनी रेल्वेमंत्र्यांना कोरोना काळात थांबा बंद झालेल्या गाड्या पुन्हा थांबवाव्यात, अशा मागणीचे निवेदनही दिले.

राजेश लाड यांनी माजी आमदार सुरेश लाड यांनी दिलेले मागण्यांचे निवेदन रेल्वेमंत्री वैष्णव यांना दिले.

या वेळी स्थानक व्यवस्थापक प्रभासकुमार लाल, रेल्वे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी खाडे, रेल्वे सुरक्षा बल निरीक्षक रणवीर सिंह, शिरीष कांबळे, राज बागुल आदी उपस्थित होते.

# रोह्यातील अभियंत्यावर प्राणघातक हल्ला करणाऱ्या आरोपीला अटक करा

## मुरूड जंजिरा नगर परिषदेतील युनियन कर्मचाऱ्यांची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेचे पाणीपुरवठा व जलनिःसारण अभियंता ओंकार प्रकाश भुरण यांच्यावर ३० एप्रिल रोजी रात्री १२.३० ते १.३०च्या दरम्यान पाईप लाईनचे काम करीत असताना कन्हैया पडवळ व त्याच्या साथीदारांनी प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्याचा मुरूड जंजिरा नगर परिषदेतील महाराष्ट्र म्युनिसिपल एम्लॉईज युनियनच्या कर्मचाऱ्यांनी मनगटावर काळ्या फिती लावून निषेध केला व आरोपीला तातडीने अटक करा, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

रोहा-अष्टमी नगर परिषदेचे मुख्याधिकारी अजय एडके व ओंकर भुरण यांनी झालेल्या घटनेची पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. नशीब बलवत्तर म्हणून भुरण या प्राणघातक हल्ल्यातून बचावले आहेत. पोलीस अधीक्षक रायगड यांनी या गंभीर घटनेकडे लक्ष देऊन गुन्हेगाराला लवकरात लवकर अटक करून मारहाण झालेल्या कर्मचाऱ्यास न्याय द्यावा. या घटनेचा जेवढा करावा तेवढा निषेध कमी आहे. यापुढे आमच्या कोणत्याही कर्मचाऱ्यांना मारहाण झाली तर आम्ही गप्पा बसणार नाही, असे महाराष्ट्र म्युनिसिपल एम्लॉईज युनियनचे रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष राकेश पाटील यांनी म्हटले आहे.

निषेधावेळी म्युनिसिपल एम्लॉईज युनियन मुरूड जंजिरा नगर परिषदेचे उपाध्यक्ष प्रकाश आरेकर, सचिव राजू पाटील, खजिनदार अभिजित चांदोरकर, नंदकुमार आंबेतकर, नरेंद्र नांदगावकर, अनिकेत वाजे, अनिकेत जगदाळे, दिप्ती एरंडे, स्वप्नजा विरकुड, प्रणाली शिंदे, सतेज निमकर, जयेश चोडणेकर, सुदेश माळी आदी उपस्थित होते.



# महिला व बालकल्याण विभाग अव्वल ठरल्याने मुरूड राष्ट्रवादीकडून आनंदोत्सव

**मुरूड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या १०० दिवस कृती आराखडा या उपक्रमात महिला व बालविकास विभागाने कल्याणकारी योजनांची यशस्वी अंमलबजावणी, विभागाचे आधुनिकीकरण व लोकाभिमुख प्रशासन हे ध्येय साध्य करत ८०% गुणांसह राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या आदिती तटकरे या खात्याच्या मंत्री असल्याने विभागास प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल मुरूड तालुका राष्ट्रवादीतर्फे शहरातील बाजारपेठ भागात फटाक्यांची आतषबाजी करून आनंद व्यक्त करण्यात आला.



आनंदोत्सवास राष्ट्रवादी मुरूड तालुका अध्यक्ष फैरोज घलटे, सचिव विजय पैर, महिला तालुका अध्यक्ष ॲड. मृणाल खोत, शहर अध्यक्ष शीतल घरत, विहूर ग्रामपंचायत उपसरपंच मुश्रत उल्डे, माजी उपसरपंच योगेंद्र गोयजी, माजी सभापती अशिका ठाकूर, रिया मयेकर, आंबुकर व घरत आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी तालुकाध्यक्ष फैरोज घलटे यांनी सांगितले की, महिला व बालकल्याण विकासमंत्री आदिती तटकरे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी उत्कृष्टरित्या केली. ५० लाख महिलांचे आधार सीडिंग करून योग्यपणे लाभ वितरण केले आहे, तर सचिव विजय पैर यांनी, आदितीताईंनी सुयोग्य नियोजन व लाभार्थी यांना त्वरित लाभाची अंमलबजावणी केल्यामुळे आज महाराष्ट्रात हा विभाग एक नंबर ठरला आम्हाला याचा सार्थ अभिमान असल्याचे सांगितले.

# खोपोलीच्या गरूडझेप अभ्यासिकेतील गैरसोयी होताहेत दूर

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली येथील गरूडझेप अभ्यासिकेत विद्यार्थ्यांना अनेक समस्या भेडसावत आहेत. याबाबत त्यांनी खोपोली खालापूर तालुका संघर्ष समितीकडे लेखी विनंती केली. समितीच्या वतीने डॉ. शेखर जांभळे व मोहन केदार यांनी पाहणी करून समस्या जाणून घेतल्या. त्यानंतर याकडे शासनाने अधिक लक्ष देऊन विद्यार्थ्यांना सोयी उपलब्ध करून द्याव्या यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्याने खालापूरचे तहसीलदार अभय चव्हाण यांनी तातडीने याकामी लक्ष देऊन अभ्यास करण्याची वेळ वाढविण्याचे पत्र देऊन इतर गैरसोयी दूर करण्याचे आदेश दिले आहेत.



रायगडचे तत्कालीन जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतुन गरुडझेप या उपक्रमातुन खोपोली व शीळफाटा येथे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थीवर्गासाठी अभ्यासिकेचा आरंभ करण्यात आला. खालापूरचे तत्कालीन तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली ही अभ्यासिका चांगल्या प्रकारे कार्यरत होती. आजपर्यंत साधारण २३ विद्यार्थी या गरुडझेप अभ्यास केंद्रांच्या माध्यमातून विविध स्तरावर शासकीय सेवेत कार्यरत आहेत हे या अभ्यासिकेचे यश आहे.

गेल्या एक ते दीड महिन्यापासून मात्र विद्यार्थी असुविधेचा सामना करीत आहे. अनेक वेळा अर्ज करूनही प्रशासन या मागण्यांकडे दुर्लक्ष करीत होते. अभ्यासिकेत अभ्यास करणारे विद्यार्थी हे समाजातील सर्व स्तरातील विदयार्थी आहेत. नोकरी करून पुढील शिक्षण घेणारे विद्यार्थी हे या अभ्यासिकेतील वाढीव वेळ मिळावा यासाठी आग्रही आहेत. येथे पिण्याच्या पाण्याची गैरसोय असून स्वछतागृहाची स्वच्छता विद्यार्थीच करीत असतात. या ठिकाणी वायफायची व्यवस्थासुद्धा विद्यार्थी स्वत: पदरमोड करून करीत आहेत.

दरम्यान, आता मंडळ अधिकारी भरत सावंत यांचेही याकामी सहकार्य लाभत असून अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांनी खोपोली खालापूर तालुका संघर्ष समिती यांचे लेखी आभार मानून सन्मान केला.

अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांना विनाअडथळा अभ्यास करता यावा यासाठी कर्तव्य भावनेतून संघर्षा समिती सदैव कार्यरत असेल व या ठिकाणी सीसीटीव्ही लावण्यासाठीदेखील प्रयत्न करणार असल्याचे सांगताना तत्परतेने दखल घेणारे खोपोलीचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, मंडळ अधिकारी भरत सावंत व तहसीलदार अभय चव्हाण यांचे खोपोली खालापूर तालुका संघर्ष समितीच्याच्या वतीने डॉ. शेखर जांभळे व मोहन केदार, सल्लागार नरेंद्र हर्डीकर यांनी आभार मानले आहेत.

# महावाचन उत्सवात घोसाळे हायस्कूलचे सुयश

**नागोठणे : बातमीदार**

सर्व शिक्षा अभियानांतर्गत रायगड जिल्हा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात महावाचन उत्सवाचे रोहा तालुकास्तरावर आयोजन करण्यात आले होते. या महावाचन उत्सवात कोएसो माध्यमिक विद्यालय घोसाळे शाळेची विद्यार्थिनी श्रद्धा संजय भगत हिने सहभाग घेतला होता. तिने इयत्ता नववी ते बारावी या गटामध्ये तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळविला. शिक्षण विभागामार्फत श्रद्धाला प्रमाणपत्र व पुढील शिक्षणाकामी उपयोगी पुस्तकांचा संच देऊन गौरविण्यात आले.



श्रद्धा भगत या विद्यार्थिनीने रोहा तालुकास्तरीय महावाचन उत्सवात उल्लेखनीय असे यश संपादन करून संस्थेचे व शाळेचे नाव तालुक्यात व जिल्ह्यात उज्वल केल्याबद्दल घोसाळे पंचक्रोशीतील ग्रामस्थ, पालक तसेच नातेवाईकांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दरम्यान, कोएसो माध्यमिक विद्यालय घोसाळे हायस्कूलच्या प्रांगणात महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून शाळेचे चेअरमन प्रकाश धुमाळ यांच्या हस्ते श्रद्धा भगत हिचा गौरव करण्यात आला.

या वेळी मुख्याध्यापक डी.एम. पवार, शाळा समिती सदस्य सूर्यकांत वैद्य, श्रीकांत गांगल, शंकर शिंदे तसेच घोसाळे पंचक्रोशीतील पालकवर्ग, शाळेतील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# ओबीसी बहुजन शिक्षक संघ प्रदेशाध्यक्षपदी सुडे

**माणगाव : बातमीदार**

ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या प्रदेश अध्यक्षपदी लातूर येथील बाभळगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा सुडे यांची निवड करण्यात आली आहे.



ओबीसी चळवळीतील योगदान, सामाजिक व शैक्षणिक कार्य, समाजाप्रती असलेली सद्भावना, संघटन कौशल्य, राबविलले उपक्रम आणि मिळालेले पुरस्कार या सर्वांचा विचार करून संघटनेने रेखा सूडे यांच्याकडे महिला प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे.

बहुजन, अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय तथा तत्सम सर्व प्रवर्गातील महिला शिक्षिकांना न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहोत, असे सूडे यांनी म्हटले आहे. निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# रेवदंड्यातील ख्रिस्ती धर्मियांचा माय दे देऊस उत्सव

रेवदंड्यातील आगरकोट किल्ला, कोर्लई किल्ला व कोर्लई गावात आजही अनेक वास्तू, ऐतिहासिक चर्च प्राचीन, पोर्तुगीज काळाची साक्ष देत आहेत. रेवदंड्यातील माय दे देऊस चर्चसुद्धा त्या काळाचा साक्षीदार असून येथे ख्रिस्ती धर्मिय श्रद्धा व भक्तीने विविध उत्सव साजरे करतात. प्रतिवर्षी ५ मे रोजी रेवदंड्यात माय दे देऊस उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा होतो.




रेवदंडा गोळा स्टॉपनजीकच असलेला माय दे देऊस चर्च ख्रिस्ती बांधवांसह सर्व धर्मियांचे श्रद्धास्थान आहे. चर्चला पत्र्याचे छप्पर असून कार्यक्रमासाठी उजव्या बाजूला मोकळी जागा असून तेथेच छोटेखानी व्यासपीठ आहे. समोरील बाजूस विहीर आहे. देवीच्या वास्तव्याने परिसरात रोगराई येत नाही अशी भक्तांची श्रद्धा आहे. वसई, मुंबई, पुणे, गोवा आदी ठिकाणाहून ख्रिस्ती बांधव देवीचा दर्शनासाठी माय दे देऊस चर्चमध्ये येत असतात.

येथे रविवार व बुधवार देवीचा वार समजला जातो. या दिवशी मंदिरात पूजा-अर्चेसाठी भाविक येत असतात. येथे राहणारे हनी आयझॅक शहापूरकर हे नित्याने मेणबत्ती लावून पूजा-अर्चा करीत असतात. दरवर्षी ५ मे रोजी येथील चर्चमध्ये उत्सव साजरा करण्यात येतो. प्राचीन काळापासून हा उत्सव साजरा करण्याची प्रथा असल्याचे सांगितले जाते. या चर्चमध्ये उत्सवापूर्वी नऊ दिवस अगोदर ख्रिस्ती बांधव सायकांळी प्रार्थना करतात. या नऊ दिवसांत कोर्लई येथील ख्रिस्ती बांधव हे नऊ दिवस कोर्लई ते रेवदंडा असे पायी चालत येत असतात. ५ मे रोजी कोर्लईसह संपूर्ण महाराष्ट्रात तसेच देश-विदेशात विखुरलेले ख्रिस्ती बांधव-भगिनी माय दे देऊस उत्सवास येत असतात. या उत्सवाच्या निमित्ताने सकाळी रेवदंडा गावातून पालखी सोहळा आयोजित केला जातो. या देवीच्या पालखीस हिंदू धर्मिय श्रीफळ अर्पण करून देवीचे दर्शन घेतात. कोर्लई गावातही ३१ मे रोजी रोगराई येऊ नये तसेच पीक उत्तम येऊन सुखशांती लाभावी यासाठी या देवीची पालखी फिरविण्यात येते.

सन १९१६मध्ये नगरचा बुरहान निजामशहाने पोर्तुगीजांना वखार बांधण्यास तसेच श्रीमंत चौल बंदरात वावर करण्याची करण्याची परवानगी दिली. सन १५२१मध्ये विजापूरच्या आरमाराने चौल जाळले व पोर्तुगीजांचा पराभव केला, मात्र बुरहाने पोर्तुगीजांचा पराभव केला. तरीही बुरहानने पोर्तुगीजांशी मैत्री कायम ठेवली आणि लोअर चौल-रेवदंडा येथे किल्ला बांधण्यास परवानगी दिली. चौलच्या प्रांताधिकारी शेख मुहम्मद यांने विश्वासघात केल्याने दिवच्या प्रांताधिकारी मलिक यांनी खाडीच्या पलिकडे तीन महिने मुक्काम ठोकला आणि आगरकोट किल्ला बांधण्यास अडथळा आणला. सन १५२४मध्ये आगरकोट किल्लाचे बांधकाम पुर्ण झाले. या आगरकोट किल्लात सातखणी तसेच पोर्तुगीजांनी आठ चर्च बांधले. त्यापैकीच माय दे देऊस चर्च असून तो आजही उत्तम प्रकारे उभा आहे.

या माय दे देऊस देवीची एक आख्यायिका सांगितली जाते. रेवदंडयातील एका मच्छीमाराला समुद्रात मच्छी पकडताना जाळ्यामध्ये देवीची मूर्ती सापडली. त्याने ती घरी आणली व तिची पूजा केली. रात्री देवीने स्वप्नात मच्छीमाराला दृष्टांत दिला आणि सांगितले, मी ख्रिस्ती धर्मियांची देवता आहे. त्यामुळे मंदिरासमान चर्च बांध. त्यानंतर हा चर्च बांधला गेला. चर्च कधी व कोणी बांधला याची माहिती उपलब्ध नसली तरी चर्च पाचशे वर्षापूर्वीचा असावा असा स्थानिकांना अंदाज आहे.

**-महेंद्र खैरे, रेवदंडा**

# पडमचे ग्रामदैवत जाखमातेचा पालखी उत्सव

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील पडम गावचे ग्रामदैवत जाखमाता देवीचा पालखी उत्सव शुक्रवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

नवसाला पावणारी देवी म्हणून पडमचे ग्रामदैवत जाखमाता देवी भाविकांमध्ये मानली जाते. संपूर्ण गाव कोळी समाजाचे असून या गावावर जाखमाता देवीचे आशीर्वाद असल्याचे ग्रामस्थ सांगत असतात. त्यामुळे दरवर्षी नवरात्र व पालखी उत्सव ग्रामस्थ मोठ्या उत्साहाने साजरा करतात.

या वर्षी पालखी उत्सव आयोजित करण्यात आला होता. ग्रामदैवताची पालखी असल्यामुळे मुंबईसह अन्य ठिकाणी असलेले ग्रामस्थ पालखी निमित्ताने गावी आले होते. या मातेची पालखी उत्सवापूर्वी संपूर्ण गाव सजले होते. गावात ठिकाणी रांगोळी काढण्यात आली होते. विद्युत रोषणाई, पताका होत्या. सायंकाळी साडेपाचच्या सुमारास जाखमाता देवीची पालखी सजवण्यात आली.

गावात प्रत्येकाच्या घरात गोड करण्यात आले होते. पालखी उत्सवादरम्यान ठिकठिकाणी शीतपेयाची व्यवस्था करण्यात आली होती. सायंकाळी ६ वाजता चालू झालेली पालखी मिरवणूक रात्रभर गावातून फिरवून पुन्हा मंदिरात आणण्यात आली.



# प्रज्ञावंत विद्यार्थी, आदर्श मुख्याध्यापिका यांचा सत्कार

**नागोठणे : बातमीदार**

अलिबाग तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या भाल प्राथमिक शाळेचा प्रज्ञावंत विद्यार्थी रूद्र राजाराम पवार (इयत्ता पाचवी) याने शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत ६१.५ टक्के गुण मिळवून घवघवीत यश मिळविले. शिवाय स्पर्धा परीक्षेतही तो चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला, तर या प्राथमिक शाळेच्या उपक्रमशील मुख्याध्यापिका रेश्मा वारगे यांनी दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ उपक्रमात जिल्हा परिषद शाळांमध्ये जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्याबद्दल या दोघांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर यांच्या हस्ते शिशुविहार प्राथमिक शाळेत करण्यात आला.

या वेळी सत्कामूर्तींचा गुणगौरव संस्थाध्यक्ष वालेकर आणि संचालक तथा माजी जिल्हा सरकारी वकील प्रसाद पाटील यांनी आपल्या भाषणात केला. सत्कारमूर्तींनी सत्कारास उत्तर दिले. प्रास्ताविक सेक्रेटरी द.ल. माळवी यांनी केले, तर आभार सहाय्यक शिक्षक विलास पनासे यांनी मानले.

कार्यक्रमास संचालिका सुषमा सोमण, रूद्रचे वडील राजाराम पवार, आई सरिता पवार, मुख्याध्यापक विजय नांदगावकर (भोवाळे), शिवाजी दराडे (उसर), गुलाब काळे (कार्ले), साधना पाटील (पवेळे), स्नेहा पाटील (वढाव), प्रतिभा पाटील (लोणारे), रेश्मा वारगे (भाल), कल्याणी वेखंडे, सीताराम जाधव (जांभूळपाडा), सहाय्यक शिक्षक समीर पाटील, मंगेश आपणकर, रूपा कैळी, जागृती पाटील, मनीषा धसाडे तसेच पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

# आरसीबीचा सीएसकेवर थरारक विजय

## अवघ्या दोन धावांनी मात; यश दयाल, रोमारियो शेफर्ड ठरले शिल्पकार

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरूने घरच्या मैदानावर खेळताना चेन्नई सुपर किंग्सचा अखेरच्या षटकात दोन धावांनी पराभव करत थरारक विजय मिळवला. या सामन्यात चेन्नईच्या फलंदाजांनी झुंज दिली खरी, पण संघाला विजय मात्र मिळवून देऊ शकले नाहीत. या विजयासह आरसीबीने आयपीएल इतिहासात प्रथमच चेन्नईचा एका सीझनमध्ये दोन वेळा पराभव केला आहे.



अखेरच्या षटकात आरसीबीला विजयासाठी १५ धावांची गरज होती. यश दयालकडे गोलंदाजी सोपवण्यात आली. यशने पहिल्या दोन चेंडूंवर १-१ धाव दिली. यानंतर तिसऱ्या चेंडूवर एमएस धोनीला एलबीडब्ल्यू बाद करीत मोठी विकेट मिळवली. यानंतर चौथ्या चेंडूवर शिवम दुबेने येताच षटकार लगावला. याचबरोबर हा चेंडू नो बॉल ठरला. यशने सलग तीन चेंडू अचूक यॉर्कर टाकत दुबे आणि रवींद्र जडेजाला धावा काढण्याची संधी दिली नाही आणि संघाला २ धावांनी थरारक विजय मिळवून दिला.

बंगळुरूने पुन्हा एकदा घरच्या मैदानावर नाणेफेक गमावली आणि सलग पाचव्यांदा प्रथम फलंदाजी करावी लागली, पण विराट कोहली आणि बेथलने धमाकेदार सुरुवात केली आणि १० षटकांत ९७ धावांची भागीदारी केली. बेथेलने त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील पहिले अर्धशतक झळकावले, तर विराटने हंगामातील त्याचे सातवे अर्धशतक झळकावले. १२व्या षटकात विराट बाद झाल्यानंतर धावांचा वेग मंदावला आणि मधल्या फळीतील फलंदाज मथिशा पाथिरानाचे बळी ठरले.

एकवेळ बंगळुरू १८ षटकांत फक्त १५९ धावांवर होता, पण रोमारियो शेफर्डने अद्भूत फलंदाजी केली आणि या हंगामात पहिल्यांदाच फलंदाजी करणाऱ्या वेस्ट इंडिजच्या फलंदाजाने फक्त १४ चेंडूत ५३ धावा केल्या. आरसीबीने शेवटच्या दोन षटकांत ५४ धावा केल्या, त्यापैकी ५२ धावा शेफर्डच्या होत्या.

# दक्ष फायटर संघ एमपीएलचा विजेता

**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळे कोळीवाड्याच्या मैदानात मंगलमूर्ती प्रीमियर लीग या प्रकाश झोतातील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेची रंगत शनिवारी (दि. ३) अंगणवाडी मैदानात पहायला मिळाली. अंतिम सामन्यात विजयाची सलामी देत दक्ष फायटर हा संघ विजेतेपदाचा मानकरी ठरला.

या क्रिकेट स्पर्धेचे यंदाचे दुसरे वर्ष होते. एमपीएल-२०२५ ही स्पर्धा केवळ दिवाळे कोळीवाड्यातील स्थानिक खेळाडूंसाठी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये आरांश पँथर, दक्ष फायटर, अवनिक सनराइजर्स, विरांश वॉरियर्स, अव्यान सुपरकिंग हे पाच संघ सहभागी झाले होते.



अवनिक सनराइजर्स संघ उपविजेता ठरला. स्पर्धेत मालिकावीर आशिष कोळी, उत्कृष्ट फलंदाज व अखेरच्या लढतीतील सामनावीर जॉन्टी कोळी, उत्कृष्ट गोलंदाज मिलिंद कावळे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक नैतिक कोळी यांची निवड करण्यात आली. विजेते संघ व खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.











**खारघर : महाराष्ट्र दिनानिमित्ताने पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या संकल्पनेतून खारघर सेक्टर १२ येथील गावदेवी मैदानावर आयोजित भाजप सांस्कृतिक महोत्सवाने रसिकांची मने जिंकली. महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी सुप्रसिद्ध गायिका मुग्धा वैशंपायन आणि गायक प्रथमेश लघाटे यांची मैफिल रंगली.**

# राष्ट्रीय दांडपट्टा स्पर्धेत अलिबागच्या खेळाडूंना चार सुवर्ण, दोन रौप्यपदके

**अलिबाग : प्रतिनिधी**

पहिली राष्ट्रीय दांडपट्टा स्पर्धा नुकतीच नाशिक पंचवटी मीनाताई ठाकरे स्टेडियम येथे झाली. या स्पर्धेत अलिबाग तालुक्यातील खेळाडूंनी चार सुवर्ण व दोन रौप्यपदक पटकावली.

रूद्रा विनय पिळणकर हिने मुक्तकला व हस्तकला या दोन्ही प्रकारात सुवर्णपदक मिळवले. शिवम संदेश गुंजाळ याने मुक्तकला प्रकारात सुवर्ण, देवदत्त मनीष पडवळने मुक्त प्रकारात सुवर्णपदक जिंकले, तर आर्य पाटील व वरद वर्तक यांनी मुक्तकलामध्ये रौप्यपदक मिळवले. या खेळाडूंना प्रियंका गुंजाळ, वेदांत सुर्वे, सिद्धार्थ पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



# गावदेवी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा रंगली



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील गावदेवी पाडा येथे अंडर आर्म बॉक्स क्रिकेटची गावदेवी प्रीमियर लीग स्पर्धा झाली. या लीगचे हे ११वे वर्ष होते.

लीगमध्ये सहा संघांनी भाग घेतला होता. लीगचे उद्घाटन संदीप पाटील, संजय मुरकुटे, पत्रकार संजय कदम, प्रमोद घरत, मंगेश भोईर, गणेश घरत, संतोष भोईर यांच्या हस्ते झाले. विजेते संघ व खेळाडूंना गौरविण्यात आले.

लीग यशस्वी करण्यासाठी आयोजन कमिटीचे शंतनू घरत, ऋतिक बताले, जागृत भोईर, श्रीकांत भोपी, आदेश घरत, अनुराग घरत, ओमी भोपी, स्पर्श शेंडे, पुष्कर, भावेश घरत, विकी काळे आदींनी प्रयत्न केले.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com